❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २८५ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



थोडक्यात...

परवानगी रद्द केल्यानंतरही आंदोलन

पुणे : दैनिक संध्या

आंदोलनाची परवानगी रद्द केल्याची माहिती दिल्यानंतरही नवी पेठेतील लालबहादुर शास्त्री रस्त्यावर बेकायदा आंदोलन केल्या प्रकरणी १५ आंदोलक विद्यार्थ्यांविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी शुक्रवारी विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला. पोलिस आयुक्तांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून प्रक्षोभक भाषणे केल्याचा तसेच आंदोलनामुळे शास्त्री रस्ता परिसरातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली. तसेच सार्वजनिक शांतता, कायदा आणि सुव्यवस्थेला बाधा निर्माण झाल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. विशेष म्हणजे एस. एम. जोशी पुलावर आंदोलन केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल नसून तो शास्त्री रस्त्यावर २ ऑक्टोबरला केलेल्या आंदोलनाच्या संदर्भात आहे. या प्रकरणी प्रमोद पाटील, अक्षय कांबळे, अनिकेत देशमाने, प्रवीण पाटील, ऋषीकेश गांगुर्डे, प्रियांका चौधरी, नितीन गिते, सोमनाथ चव्हाण, ओंकार पाटील, गजानन शेळके, अजित काकडे, सिद्धार्थ पंचांगे, संकेत कणसे, सिद्धार्थ जांभुळकर व साहेबराव क्षीरसागर या १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिस हवालदार समीर पवार यांनी फिर्याद दिली आहे.

पालिकेकडून अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त

मांजरी : दैनिक संध्या

अनधिकृत बांधकामे व प्लॉटिंग विरोधी मोहिमेत महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून मांजरी परिसरात धडक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत ९० हजार चौरस फुटांवरील तब्बल ३८ हजार चौरस फूट नियमबाह्य बांधकामे पाडण्यात आली. महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी मोहिमेतील ही अलीकडील काळातील मोठी कारवाई मानली जात आहे. या कारवाईदरम्यान परवानगीविना उभारण्यात आलेल्या आरसीसी इमारती, स्लॅब, भिंती, कॉलम व अनधिकृत प्लॉटिंग तसेच इतर विविध अनधिकृत बांधकामे यंत्रांच्या सहाय्याने हटविण्यात आले. नियमांचे उल्लंघन करून उभारण्यात आलेल्या बांधकामांवर महापालिकेने कठोर भूमिका घेत ही कारवाई केली. शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपअभियंता संदीप शिंदे तसेच कनिष्ठ अभियंता रमीज फारस, ऋतुजा चिलकेवर व आरेखक जयश्री जोशी यांच्या पथकाने ही कारवाई केली. कारवाईसाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ, जॉ कटर, जेसीबी तसेच इतर यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला. पोलिस बंदोबस्तात ही कारवाई केली. 'नागरिकांनी अनधिकृत प्लॉटिंगमधील भूखंड तसेच अनधिकृत बांधकामांमधील सदनिकांची खरेदी टाळावी. शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधातील कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार आहे. अशा प्रकारचे अनधिकृत प्लॉटिंग किंवा बांधकाम निदर्शनास आल्यास संबंधितांवर महानगरपालिकेमार्फत कठोर कारवाई करण्यात येईल.'

माशी मारण्यासाठी हातोड्याचा वापर नको

सरन्यायाधीशांनी फटकारलं; सीजेपी आंदोलनावर कोर्टात घमासान

■ मुंबई (दै. संध्या)

दिल्लीत जंतरमंतरवर आज 10 ऑक्टोबर रोजी कॉकरोच जनता पार्टीचं आंदोलन होणार आहे. त्यापूर्वीच या आंदोलनाला लगाम घालण्यासाठी दिल्लीत मेट्रो आणि रेल्वे सेवा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं आहे. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने सरकारला चांगलंच फटाकरलं आहे. आंदोलनाचा बहाणा करून संपूर्ण शहराला बंद ठेवता येणार नाही. अशा निर्णयामुळे सामान्य नागरिकांना मोठा त्रास होऊ शकतो. माशी मारण्यासाठी हातोड्याचा वापर करू नका, असं फटकारतानाच दिल्लीतील मेट्रो आणि ट्रेन 10 ऑक्टोबर रोजी पूर्णपणे बंद ठेवू नका, असे आदेशच कोर्टाने दिले आहेत. कोर्टाच्या या आदेशामुळे सीजेपीचं आंदोलन दडपण्याच्या प्रकाराला लगाम लागला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत, जस्टीस जॉयमाल्या बागची आणि जस्टीस व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. खंडपीठाने दिल्लीतील मेट्रो स्टेशन बंद करण्याच्या प्रस्तावावर चिंता व्यक्त केली. तसेच केवळ आंदोलन होत आहे म्हणून संपूर्ण शहर बंद करता येणार नाही. अशी पावलं उचलल्याने सामान्य नागरिकांना मोठा त्रास होऊ शकतो, असं कोर्टाने म्हटलं आहे. यावेळी कोर्टाने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांचं म्हणणंही रेकॉर्ड करून घेतलं. अधिकाऱ्यांना या बंदीवर पुनर्विचार करण्यास सांगितलं जाईल, तसेच मेट्रो आणि इतर रेल्वे सेवा नियंत्रित पद्धतीने चालवण्याची परवानगी देण्यास सांगण्यात येईल. जेणे करून दिल्लीकरांना आणि सामान्य नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, असं मेहता यांनी कोर्टाला सांगितलं होतं.

कोणत्याही परिस्थिती मेट्रो ट्रेन पूर्णपणे बंद करू नये, असं आमचं म्हणणं आहे, असं जोर देऊन सांगतानाच मेट्रो आणि ट्रेन पूर्णपणे बंद करू नका. त्याची माहिती नागरिकांना द्या. किती ट्रेन आणि मेट्रो सुरू राहणार याचा प्रचार प्रसार करा. त्यामुळे नागरिकांना त्रास होणार नाही, अशा सूचनाही कोर्टाने दिल्या आहेत. तसेच रस्ते मार्गे प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी वाहतूक विभागाने ॲडव्हायजरी जारी कराव्यात, असे निर्देशही कोर्टाने दिले आहेत. आज 10 ऑक्टोबर रोजी कॉकरोच जनता पार्टीने दिल्लीत आंदोलन पुकारलं आहे. तसेच विविध राजकीय पक्षांचीही आंदोलनं दिल्लीत सुरू आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा ही प्रमुख मागणी या आंदोलकांची आहे. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून



मेट्रो आणि ट्रेन बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यावर कोर्टाने ही चिंता व्यक्त केली. जे हजारो प्रवासी गुरुग्राम, ग्रेटर नोएडा, पूर्व दिल्ली आणि दक्षिण दिल्लीत रोजीरोटीसाठी येतात, त्यात विद्यार्थी, कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिक असतात, त्यांचे हाल होऊ नये ही आमची चिंता आहे, असं कोर्टाने म्हटलं.

यावेळी केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी बाजू मांडली. मेट्रो पूर्णपणे बंद केली जाणार नाही. केवळ ट्रेनची संख्या कमी केली जाणार आहे. मेट्रोचीही संख्या कमी केली जाणार आहे. मेट्रो आणि ट्रेन पूर्णपणे बंद केल्या जाणार नाहीत, असं तुषार मेहता म्हणाले. त्यावर न्यायामूर्ती बागची यांनी मेहता यांना चांगलंच घेरलं. एकीकडे तुम्ही मेट्रोची संख्या कमी करणार असल्याचं म्हणता. दुसरीकडे सकाळी 9 वाजल्यापासून पुढील आदेशापर्यंत स्टेशन बंद राहणार आहेत, असंही तुम्ही म्हणता, हे कसं शक्य आहे? असा सवाल करत बागची यांनी मेहता यांची कोंडी केली. तुम्ही असं पाऊल उचणार असेल तर लोकांची ये जा बंद होऊन जाईल. त्यांना कामावर जाणंच कठिण होईल, असं सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले. यावेळी सरन्यायाधीशांनी एक उदाहरण दिलं. समजा, आज कोर्टाचं कामकाज सुरू आहे. बहुतेक वकिलांकडे कार आहेत. त्यामुळे त्यांना यायला काही अडचण होणार नाही. पण काम करणाऱ्या क्लर्कचं काय होणार? स्टाफचं काय होणार? कँटीन, कॅफे आणि दुसऱ्या ठिकाणी काम करणाऱ्यांचं काय होणार? त्यामुळे याबाबत तुम्ही तात्काळ काही तरी हालचाल कराल, असं आम्हाला वाटतं.



हा देश भाजपचा झालेला आहे. देशातील सर्व संस्था भाजपच्या झाल्या आहेत. यामुळे ते कुणाचे ऐकायला तयार नाहीत. तुम्ही रेल्वे मेट्रो सेवा कशी बंद करू शकता? आता ते लोक विमानांच्या प्रवाशांची यादी मागत आहेत. सरकार देशातील तरुणांना घाबरलेलं आहे. हे डरपोक सरकार आहे. मला अटक करा, मला अटक केल्याने देशाच्या अडचणी दूर होणार असतील तर मला अटक करा. मी दिल्लीला जाणार आहे. जर मला अटक करायचे असेल तर करा. तरुणांची एवढी भीती वाटते तर देश बंद करा. **- अभिजीत दिपके**

आंध्र प्रदेशच्या आधुनिक मत्स्य प्रयोगांचा महाराष्ट्रात प्रभावी वापर करणार : नितेश राणे

■ मुंबई (दै. संध्या)

मत्स्य उत्पादनापासून प्रक्रिया, बाजारपेठ आणि निर्यातीपर्यंत प्रत्येक टप्प्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी आंध्र प्रदेशातील उपयुक्त प्रयोगांचा महाराष्ट्रात प्रभावी वापर केला जाणार आहे. त्यातून मच्छीमार व मत्स्य शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून राज्यात सक्षम, शाश्वत आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक मत्स्य परिसंस्था उभारण्यावर भर दिला जाईल, असे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. आंध्र प्रदेशच्या दोन दिवसीय अभ्यास दौऱ्यात मंत्री राणे यांनी तेथील मत्स्य आयुक्तालयाच्या मुख्यालयास भेट देऊन मत्स्यव्यवसाय व ॲक्वाकल्चर क्षेत्राच्या विकास मॉडेलची सविस्तर पाहणी केली. यावेळी त्यांनी आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादकता वाढ, मच्छीमार कल्याण आणि एकात्मिक मत्स्य मूल्यसाखळीचा आढावा घेतला. मत्स्य आयुक्तालयातील बैठकीत मत्सव्यवसाय मंत्री राणे यांनी सागरी व अंतर्देशीय मत्स्यव्यवसायासह ॲक्वाकल्चर क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना जाणून घेतल्या. यामध्ये एआय-आधारित 'Aquaculture 4.0', मत्स्य आरोग्य व रोग निरीक्षण, पाण्याच्या गुणवत्तेचे रिअल-टाइम परीक्षण, स्मार्ट फीडिंग, माशांच्या वर्तनाचे विश्लेषण,आरएएस व बायोफ्लॉक, आयओटी, आधारित ॲक्वाकल्चर, डिजिटल ट्रेसेबिलिटी, तलाव नोंदणी, प्रजाती विविधीकरण, बोटींचे ट्रॅकिंग आणि मासेमारीतील पकड निरीक्षण यांचा समावेश होता. समुद्री शेवाळ लागवड, कृत्रिम प्रवाळ भित्तिका, खुल्या समुद्रातील केज कल्चर, हवामान बदलास सक्षम किनारी मच्छीमार गावे आणि



■ दोन दिवसीय अभ्यास दौऱ्यात मत्स्यव्यवसाय व ॲक्वाकल्चर विकास मॉडेलचा आढावा

■ तंत्रज्ञानाधारित, शाश्वत आणि जागतिक स्पर्धाक्षम मत्स्य परिसंस्थेवर भर

अंतर्देशीय जलस्रोतांचा शास्त्रीय पद्धतीने उपयोग या विषयांचीही त्यांनी पाहणी केली. हॅचरी, मत्स्य खाद्य, प्रयोगशाळा, मत्स्यपालन, प्रक्रिया उद्योग, शीतगृहे, देशांतर्गत बाजारपेठ आणि निर्यात यांना परस्परांशी जोडणाऱ्या एकात्मिक मत्स्य मूल्यसाखळीच्या विकास मॉडेलची माहितीही या दौऱ्यात घेण्यात आली. आंध्र प्रदेशने तंत्रज्ञान आणि डेटा-आधारित व्यवस्थापनाच्या माध्यमातून मत्स्य उत्पादन, प्रक्रिया, विपणन व निर्यात या सर्व टप्प्यांमध्ये उत्पादकता आणि उत्पन्नवाढीवर भर दिला आहे. महाराष्ट्राच्या किनारी भागासह अंतर्देशीय जलस्रोतांचा अधिक शास्त्रीय आणि उत्पादक वापर करून मच्छीमार, मत्स्य शेतकरी व किनारी समुदायांसाठी अधिक मूल्यनिर्मिती करण्याच्या दृष्टीने या अभ्यासातील उपयुक्त बाबींच्या अंमलबजावणीसाठी पुढील कार्यवाही केली जाईल.

'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज'स्पर्धेला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : लोढा

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभागी व्हावे असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर कक्ष येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले. यावेळी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगरू डॉ.अपूर्वा पालकर,कुलसचिव डॉ.वैभव नरवडे, सृजन ट्रस्टचे विश्वस्त दिपक मुकादम, डॉ. अमित नेहते, विज्ञानभारती कोकण प्रांतच्या अनुपमा कुलकर्णी उपस्थित होते. सृजन ट्रस्ट, पुणे आणि विज्ञान भारती कोकण प्रांत या दोन्ही संस्थांसह कौशल्य विकास विभागाने सामंजस्य करार केला. कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, केंद्रीय कौशल्य विभागामार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सुरू असलेल्या सेवा संकल्प अभियानांतर्गत 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज स्पर्धा या बहुराज्यीय नवोपक्रम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या मार्फत महाराष्ट्रात देखील या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. २१ सप्टेंबरपासून अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून १७ ऑक्टोबर २०२६ पर्यंत ऑनलाईन माध्यमातून अर्ज करता येणार आहे. महाराष्ट्रातून ३८७८ स्पर्धकांनी आतापर्यंत अर्ज केला आहे स्पर्धेत सहभागी स्पर्धकांना कौशल्य विकास विभागामार्फत मार्गदर्शन केले जात आहे.

कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज' स्पर्धेच्या माध्यमातून



कृषी, आरोग्य, महिला सुरक्षा,नागरी विकास, पर्यावरण, संरक्षण, कृत्रिम बुध्दिमत्ता, शिक्षण आणि रोजगारक्षमता अशा विविध क्षेत्रातील समस्या समजून सर्जनशील उपाय देण्याची संधी शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मिळणार आहे. या स्पर्धेत नवोन्मेषक, विद्यार्थी, विद्यार्थी गट, संशोधक, प्राध्यापक, स्टार्टअप्स, एमएसएमई, कंपन्या, सामाजिक संस्था, शैक्षणिक व संशोधन संस्था तसेच इतर इनोव्हेशन टीम्स यांना या स्पर्धेत सहभाग घेता येईल. या स्पर्धेसाठी वयोमर्यादा नसून प्रत्येकाच्या सर्जनशीलतेला संधी मिळणार आहेत. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार विशेषतः ग्रामीण भागातील मुलांचा यामध्ये सहभाग वाढवण्यासाठी आम्ही कार्यरत असल्याचेही कौशल्य मंत्री लोढा यांनी संगितले. कौशल्य मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, या स्पर्धेमध्ये ऑनलाईन माध्यमातून विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे. https://sevainnovationchallenge.in/ या लिंकच्या माध्यमातून अथवा क्यूआर कोड स्कॅन करून इच्छुक स्पर्धेसाठी आपला प्रकल्प सादर करू शकतात. या पोर्टलवर पहिल्या स्तरावर प्राथमिक माहिती नोंदणीसाठी आवश्यक असेल तसेच दुसऱ्या स्तरावर प्रकल्प सादर करतांना आधार संलग्न वैयक्तिक माहिती व प्रकल्पाची माहिती उमेदवारांना सादर करावी लागणार आहे. सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होणार असून उमेदवारांच्या शंकेचे निरसन करण्यासाठी चॅट बॉट सुविधा सुद्धा संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. सृजन ट्रस्ट, पुणे आणि विज्ञान भारती कोकण प्रांत या दोन्ही संस्थांसह कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभागाने सामंजस्य करार केला. या संस्थांच्या मदतीने स्पर्धेसाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येणार असून, त्यांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सृजन ट्रस्ट, पुणे आणि विज्ञान भारती कोकण प्रांत या दोन्ही संस्थां सहकार्य करणार आहे. प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे, तसेच स्पर्धेसाठी आवश्यक मार्गदर्शन सुद्धा विज्ञान भारती कोकण प्रांत संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

एसटीच्या अतिरिक्त जमिनींच्या व्यावसायिक विकासाला वेग

मंत्री प्रताप सरनाईक : पीपीपी तत्वावर विकासातून एसटीला भरीव उत्पन्नाचा नवा स्रोत

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातील अतिरिक्त जमिनींचा अधिकाधिक व्यावसायिक वापर करून महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर विकास करण्यास आणि त्यासाठी ४९+४९ वर्ष असा एकूण ९८ वर्षांपर्यंतचा भाडेपट्टा करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे एसटीच्या मालमत्तेतून नियमित व दीर्घकालीन उत्पन्न मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली या प्रक्रियेसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या निर्णयामुळे एसटीच्या आर्थिक बळकटीकरणाला मोठी चालना मिळणार असून, महामंडळाच्या जमिनींचा नियोजनबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने व्यावसायिक वापर करता येणार आहे. शासन निर्णयानुसार, एसटी



महामंडळाच्या स्वमालकीच्या, भूसंपादनातून संपादित, पूर्वीच्या रोड ट्रान्सपोर्ट विभागाकडून हस्तांतरित, भाडेकरारावरील तसेच बक्षीसपत्राद्वारे प्राप्त अशा विविध प्रकारच्या जमिनींवर पीपीपी अंतर्गत विकास प्रकल्प राबविता येणार आहेत. पीपीपी तत्वावरील विकासासाठी अंतिम टप्प्यात असलेल्या व्यवहार्य प्रकल्पांना महाराष्ट्र सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरण, २०२६ अंतर्गत काही सवलती देण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

प्रकल्पाच्या निविदा, सवलत करारनामा आणि व्यवहार्य संरचनेसाठी संबंधित समितीची मान्यता घेण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक प्रकल्पाच्या अंतिम निविदेला मुख्यमंत्री स्तरावर मान्यता घेणे बंधनकारक राहणार आहे.

एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीचा विचार करून, दीर्घकालीन भाडेकरारापेक्षा अपफ्रंट प्रीमियमसह ९० वर्षांचा लीज मॉडेल महामंडळासाठी अधिक फायदेशीर ठरू शकतो, अशी शिफारस सुबोधकुमार समितीने केली होती. त्यानंतर शासनाने भाडेपट्ट्याचा कालावधी वाढवून (४९+४९) ९८ वर्षांपर्यंत करण्यास मान्यता दिली आहे. महामंडळाच्या राज्यभरातील सुमारे ८५० ठिकाणी ३५०० एकरांपेक्षा अधिक जमीन उपलब्ध आहे. यातील मोठ्या प्रमाणातील जमीनी मोक्याच्या ठिकाणी आहे.

या जमिनींचा व्यापारी, निवासी, औद्योगिक तसेच अन्य व्यावसायिक कारणांसाठी नियोजनबद्ध विकास केल्यास महामंडळाला आगावू प्रीमियम सह मोठ्या प्रमाणावर नियमित उत्पन्न मिळू शकते. तसेच व्यवसायिक संकुलात देखील महामंडळाला हिस्सा मिळणार असल्याने त्यातून नियमित वार्षिक उत्पन्न देखील महामंडळाला प्राप्त होणार आहे.



अजितदादा सोमेश्वर विकास पॅनलची जोरदार शक्ती प्रदर्शन करत सांगता सभा

■ सोमेश्वरनगर (दै. संध्या)

श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस असून लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनल प्रमुख माजी चेअरमन पुरुषोत्तम दादा जगताप व पुरंदरचे मा.आमदार संजय जगताप यांनी कारखाना परिसरात जोरदार शक्ती प्रदर्शन करत सांगता सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष मुगुटराव आप्पा काकडे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सांगता सभेस सुरुवात करण्यात आली.सभासदांच्या हितासाठी व शेतकऱ्यांच्या विकासासाठी कार्य करणार असल्याचे पुरुषोत्तम जगताप यांनी सांगितले.तसेच सर्व सभासदांनी कारखान्याच्या विकासासाठी शिट्टी या चिन्हासमोर शिक्का मारून लोकनेते अजितदादा सोमेश्वर विकास पॅनेलच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन पुरुषोत्तम जगताप व संजय जगताप यांनी केले.

■ शिट्टी चिन्हासमोरील बटन दाबून सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे मा.आमदार संजय जगताप व पुरुषोत्तम जगताप यांच्यावतीने आवाहन

थोडक्यात पण महत्वाचे



श्री सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पवार पॅनलच्यावतीने कदम यांचा घरोघरी प्रचार

■ मोरगाव परिसरात सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

मोरगाव : दैनिक संध्या

श्री सोमेश्वर विकासपुरुष अजितदादा पवार पॅनलच्या प्रचारार्थ मोरगाव-वडगाव गटातील पुणे जिल्हा परिषद लोकप्रिय व कार्यक्षम सदस्या सौ.रोहिणीताई संदिप कदम (ढोले) यांच्या सोबत उमेदवार रविंद्र काका भापकर तसेच आजी माजी पदाधिकाऱ्यांसह उपस्थित मान्यवर,सभासद व कार्यकर्ते उपस्थित होते.

सणसर येथे माहिती अधिकार कार्यशाळा व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

वालचंदनगर : दैनिक संध्या

माहिती अधिकार दिनानिमित्त माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती, पुणे जिल्ह्याच्या वतीने माहिती अधिकार कार्यशाळा व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पालखी तळ, सणसर, ता. इंदापूर, जि. पुणे येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती चैतन्य कदम यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच तहसीलदार, पोलीस अधिकारी, गटविकास अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यशाळेत माहितीचा अधिकार, त्याचा प्रभावी वापर आणि नागरिकांच्या हक्कांविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याच कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. नागरिकांनी तसेच विद्यार्थी, पालक, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

सर्प, पक्षी व वन्यप्राण्यांच्या संरक्षणाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



बारामती : दैनिक संध्या

वनविभाग व बचाव पथक बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताहाच्या सांगता समारंभाचे आयोजन सुपे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये करण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी अश्विनी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी सर्प, पक्षी व इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी रेस्क्यू पथकाचे श्रेयस कांबळे यांनी 'वन्यजीव सहजीवन व वन्यजीव संरक्षण' या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. सर्पांच्या विविध जाती, सर्पदंशाबाबत घ्यावयाची काळजी, पक्षी व त्यांच्या पिलांची निगा, तसेच जखमी किंवा निराधार वन्यप्राण्यांना आढळल्यास करावयाची कृती याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. वन्यजीव बचाव प्रक्रियेची माहितीही देण्यात आली. वन्यजीवांबाबतचे गैरसमज दूर करून मानव आणि वन्यजीव यांच्यातील सहजीवनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. यावेळी वन्यजीव सप्ताहानिमित्त आयोजित निबंधलेखन व चित्रकला स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी अश्विनी शिंदे व श्रीमती शीतल फुंदे यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेतील एकूण २६० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूल, सुपे येथील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. वन्यजीव सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव संरक्षण, पर्यावरण संवर्धन, सर्प व इतर वन्यप्राण्यांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि मानव-वन्यजीव सहजीवनाची भावना रुजविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाला वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच वनरक्षक, वनसेवक उपस्थित होते.

महात्मा गांधींचे विचार आजही दिशादर्शक : उल्हास पवार

■ नारायणगाव (दै. संध्या)



ग्रामोन्नती मंडळाचे गुरुवर्य रा.प.सबनीस विद्यामंदिर ,माजी विद्यार्थी संघटना व राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी जयंतीनिमित्त 'महात्मा गांधी : काल, आज आणि उद्या' या विषयावर ज्येष्ठ नेते तथा माननीय मा. आमदार उल्हासदादा पवार यांचे विचारप्रवर्तक व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी त्यांनी महात्मा गांधींच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांना गांधी विचारांची ओळख करून दिली.

पूर्वीच्या काळात पाण्याची टंचाई जाणवत नसतानाही महात्मा गांधी यांनी 'पाणी वाचवा' असा संदेश दिला होता. भविष्यातील संकटांचा वेध घेऊन गांधीजींनी दिलेला हा संदेश आज अधिक महत्त्वाचा ठरत असल्याचे आमदार पवार यांनी सांगितले. तसेच 'खेड्याकडे चला' हा गांधीजींचा संदेश स्पष्ट करताना खेड्यांचा विकास झाला, तरच देशाचा सर्वांगीण विकास होईल, असे त्यांनी नमूद केले. गांधीजींच्या या विचारांच्या धर्तीवर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे आणि ग्रामीण भागाचा विकास व्हावा, या उद्देशाने गुरुवर्य सबनीस साहेबांनी विद्यामंदिराची स्थापना केली, असेही त्यांनी सांगितले. शांतता आणि क्रांती या परस्परविरोधी वाटणाऱ्या गोष्टी एकत्र येऊ शकतात, हे महात्मा गांधींनी आपल्या कार्यातून जगाला दाखवून दिले. सत्य, अहिंसा आणि शांततेच्या मार्गानेही मोठे सामाजिक परिवर्तन घडवून आणता येते, हे गांधीजींच्या जीवनकार्याने सिद्ध केले असल्याचे पवार यांनी सांगितले. अहिंसेचे तत्त्व स्पष्ट करताना त्यांनी गांधीजींच्या जीवनातील विविध प्रसंग व उदाहरणे सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमास ग्रामोन्नती मंडळाचे विश्वस्त प्रकाश पाटे, मोनिका मेहेर, कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर, अध्यक्ष सुजित खैरे, उपाध्यक्ष शशी वाजगे, कार्यवाह रवींद्र पारगावकर, संचालक ऋषिकेश मेहेर, सामाजिक कार्यकर्त्या राजश्री बोरकर, आशिष माळवदकर, ओंकार माळवदकर, भोला वांजळे, बाळासाहेब पवार, माजी विद्यार्थी संघाचे सदस्य मंदार पाटे, निलेश दळवी, अशफाक पटेल, राजेश रत्नपारखी, राखी रत्नपारखी, शरद दरेकर विद्यामंदिराच्या मुख्याध्यापिका मानसी भालेराव, उपप्राचार्य संजय वलटे, पर्यवेक्षक सुनील ढवळे, समन्वयक महेबुब काझी, संतोष देशपांडे, जयहिंद संकुलचे प्राचार्य आंद्रे सर, राजे छत्रपती पतसंस्थेचे अध्यक्ष जुबेरभाई शेख व अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

मुख्याध्यापिका मानसी भालेराव यांनी आपल्या मनोगतात माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना, संघटनेचे कार्य आणि शाळेच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांचे योगदान याविषयी प्रास्ताविकातून माहिती दिली. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष योगेश बाबू पाटे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय राखी रत्नपारखी यांनी करून दिला. सूत्रसंचालन रमेश शेटे यांनी केले, तर आभार निलेश दळवी यांनी मानले.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत 'वसुंधरा पायी दिंडी' पिंपरे खुर्दमध्ये दाखल

■ नीरा (दै. संध्या)



अध्यात्माची जोड देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनमानसात रुजविण्यासाठी पुण्याहून नाणीजधामच्या दिशेने निघालेला 'वसुंधरा पायी दिंडी सोहळा' आज पुरंदर तालुक्यातील पिंपरे खुर्द येथे रात्रीच्या मुक्कामासाठी दाखल झाला. या दिंडी सोहळ्यामध्ये एक हजारांहून अधिक भाविक भक्त सहभागी झाले असून, यंदा पुण्यातून निघालेल्या या दिंडीचे हे दुसरे वर्ष आहे. पिंपरे खुर्द येथे ग्रामस्थांनी दिंडी सोहळ्याचे उत्साहात स्वागत केले.

जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने आणि मुख्य पीठ नाणीजधाम क्षेत्र पश्चिम महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या दिंडीच्या माध्यमातून अध्यात्मासोबतच पर्यावरण रक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला जात आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश घेऊन मार्गस्थ झालेल्या या दिंडीतील भाविकांकडून प्रवासादरम्यान विविध गावांमध्ये पर्यावरण जागृती केली जात आहे. तसेच वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि ग्रामस्वच्छतेचे महत्त्व ग्रामस्थांना पटवून दिले जात आहे. पुणे ते नाणीजधाम असा ३५० किलोमीटरहून अधिक अंतराचा प्रवास करणाऱ्या या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे भक्ती, सेवा आणि निसर्ग संवर्धन यांचा साधलेला सुरेख संगम होय. केवळ वृक्षलागवड करून न थांबता लावलेल्या झाडांचे संगोपन करणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि पर्यावरणाप्रती सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

बिट लासुर्णे येथे पोषण माह २०२६ उत्साहात साजरा

सेवा संकल्प अभियानांतर्गत अंगणवाडी सेविकांचा सत्कार; बालकांना खाऊचे वाटप

■ वालचंदनगर (दै. संध्या)



एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प इंदापूर-२ अंतर्गत बिट लासुर्णे येथील विठ्ठल मंदिरात शुक्रवार दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी पोषण माह २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सेवा संकल्प अभियानांतर्गत अंगणवाडी सेविकांचा सत्कार करण्यात आला, तसेच लहान बालकांना खाऊचे वाटप करण्यात आले. बालकांचे पोषण, आरोग्य आणि सर्वांगीण विकास याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

बिट लासुर्णे अंतर्गत एकूण ३० अंगणवाडी केंद्रे कार्यरत आहेत. या केंद्रांमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या संकल्पना व थीमनुसार विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तसेच १९ सप्टेंबर ते १९ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या सेवा संकल्प अभियानांतर्गत बिट स्तरावर अंगणवाडी सेविकांच्या कार्याचा गौरव करून त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये 'नवचेतना' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांद्वारे बालकांचे पोषण, आरोग्यविषयक जागरूकता आणि बालविकासाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. लहान बालकांना खाऊचे वाटप करून त्यांच्या आनंदात भर घालण्यात आली. या कार्यक्रमाला ग्रामसेवक स्वप्नील गायकवाड, इंदापूर पंचायत समितीचे सभापती हर्षवर्धन लोंढे, एकता फाउंडेशनचे अध्यक्ष विजय सुतार, शिवाजी सासवडे, बिट पर्यवेक्षिका श्रीमती नसरीन शौकत तांबोळी यांच्यासह अंगणवाडी सेविका पूजा नलावडे, राजश्री सुतार, काजल लोंढे, विजया निंबाळकर, मंगल मुळीक आणि स्वाती मांढरे उपस्थित होत्या. पोषण माहाच्या माध्यमातून बालकांचे आरोग्य, योग्य पोषण आणि सर्वांगीण विकास यांना प्राधान्य देत अंगणवाडी स्तरावर विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमामुळे अंगणवाडी सेविकांच्या कार्याला प्रोत्साहन मिळाले, तसेच बालकांच्या पोषणाबाबत जनजागृती करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाले.

खो-खोच्या मैदानावर ज्ञानसागरची दमदार झेप; मुला-मुलींचे संघ उपविजेते!

■ सावळ (बारामती) (दै. संध्या)



महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शासकीय तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुलच्या १४ वर्षे वयोगटातील मुला-मुलींच्या संघांनी उल्लेखनीय कामगिरी करत दुहेरी उपविजेतेपद पटकावले.स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुलच्या १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने उत्कृष्ट सांघिक खेळ,वेगवान हालचाली,अचूक डावपेच आणि जबरदस्त जिद्द दाखवत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली.अंतिम सामन्यात दमदार खेळाचे प्रदर्शन करत संघाने तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक मिळवत उपविजेतेपद संपादन केले.

याचबरोबर ज्ञानसागर गुरुकुलच्या १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघानेही संपूर्ण स्पर्धेत आत्मविश्वासपूर्ण आणि कौशल्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन केले. प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज देत मुलींच्या संघानेदेखील द्वितीय क्रमांक मिळवून तालुकास्तरीय उपविजेतेपद आपल्या नावावर केले. मुला-मुलींच्या दोन्ही संघांनी मिळवलेल्या या उल्लेखनीय यशामुळे ज्ञानसागर गुरुकुलच्या क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण प्रगतीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. विद्यार्थ्यांमध्ये खेळाडूवृत्ती,शिस्त, संघभावना आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी संस्थेकडून दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनाचे हे यशस्वी फलित मानले जात आहे. ज्ञानसागर गुरुकुलच्या मुला-मुलींच्या दोन्ही संघांनी मिळविलेल्या या दुहेरी उपविजेतेपदामुळे संस्थेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा अधिक भक्कम झाली असून,आगामी स्पर्धांमध्येही विद्यार्थी यापेक्षा अधिक दमदार कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ.सागर आटोळे सर,मुख्याध्यापक,क्रीडा शिक्षक,प्रशिक्षक,शिक्षकवृंद व पालकांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कोरेगावमूळ येथे शनिवारी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरु असलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत कोरेगावमुळ येथे शनिवारी (दि. १० ऑक्टोबर) मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ना.चंद्रकांत दादा पाटील, राजेश दादा पांडे आणि समर्थ युवा फाउंडेशन यांच्या वतीने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांची विविध प्रकारची आरोग्य तपासणी मोफत करण्यात येणार आहे. यामध्ये रक्तातील सर्व घटकांची तपासणी (CBC), हिमोग्लोबिन, रक्तातील साखर, कोलेस्ट्रॉल, रक्तदाब, ईसीजी, टी.बी. (क्षयरोग) तपासणी व एक्स-रे, डोळ्यांची तपासणी तसेच दंत तपासणी आदी आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. याशिवाय महिलांसाठी मॅमोग्राफीद्वारे स्तनाच्या कर्करोगाची प्राथमिक तपासणी, आवश्यक औषधे व गोळ्यांचे मोफत वितरण, आयुष्मान भारत कार्ड तसेच आभा (ABHA) कार्ड काढून देण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कोरेगाव मूळ येथील स्थानिक प्रमुख केंद्र / ग्रामपंचायत येथे हे शिबिर होणार आहे. शिबिरामध्ये सुमारे १३ हजार ५०० रुपयांपर्यंतच्या आरोग्य तपासण्या मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याने परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्ट्रीट फूड विक्रेत्यांसाठी निःशुल्क अन्न सुरक्षा प्रशिक्षण उत्साहात संपन्न

५०० खाद्यपदार्थ विक्रेत्यांना FSSAI–FoSTaC अन्न सुरक्षा प्रमाणपत्राचे वाटप

■ पुणे (दै. संध्या)



पुणे शहरातील स्ट्रीट फूड विक्रेत्यांनी नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व गुणवत्तापूर्ण अन्न उपलब्ध करून द्यावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले निःशुल्क अन्न सुरक्षा प्रशिक्षण व प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम दि. ३ ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत उत्साहात संपन्न झाला.

नॅशनल असोसिएशन ऑफ स्ट्रीट व्हेंडर्स ऑफ इंडिया (NASVI) महाराष्ट्र, Nestlé India, FSSAI, FDA महाराष्ट्र राज्य आणि पथ विक्रेता एकता समिती महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन तीन दिवस पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या पत्रकार भवन कॉन्फरन्स हॉल, नवी पेठ, गांजवे चौक, पुणे येथे, तर दोन दिवस हिंदू हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालन, पुणे महानगरपालिका, सारसबाग रोड, सणस ग्राउंडसमोर, पुणे येथे करण्यात आले.

या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या एकूण ५०० स्ट्रीट फूड विक्रेत्यांना अन्न हाताळणी, वैयक्तिक स्वच्छता, खाद्यपदार्थांची सुरक्षित साठवणूक, विक्री परिसराची स्वच्छता, ग्राहकांना सुरक्षित अन्न देण्याच्या पद्धती तसेच अन्न सुरक्षा कायदे व नियमांचे पालन याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

स्वच्छता व अन्न सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या ॲप्रन, कॅप, हातमोजे, टॉवेल, ब्रश, मॉप, साबण आदी साहित्याचा योग्य वापर याबाबतही प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या सर्व ५०० विक्रेत्यांना FSSAI–FoSTaC मान्यताप्राप्त अन्न सुरक्षा प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास श्री. दिगंबर भोगावडे, सहआयुक्त (अन्न), FDA पुणे विभाग; श्री. एन. आर. सरकटे, सहाय्यक आयुक्त, FDA पुणे; श्री. जय भद्र मिश्रा, प्रादेशिक कॉर्पोरेट अफेअर्स मॅनेजर, Nestlé India Limited; श्री. राजीव जी, NASVI प्रशिक्षक; तसेच श्री. दिपक मोहिते, अध्यक्ष, पथ विक्रेता एकता समिती महाराष्ट्र राज्य व NASVI लीडर यांचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमास पुणे महानगरपालिका नगर पथ विक्रेता समितीच्या सदस्य व पथ विक्रेता एकता समिती महाराष्ट्र राज्याच्या महासचिव श्रीमती भीमाबाई लाडके, तसेच सागर दहिभाते, गजानन पवार, निलम अय्यर, मंदार धुमाळ, राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनिल शेवाळे, महासचिव अभय अगरवाल, संघटक सचिव संजय कांची, ऋषिकेश सावंत आणि पुणे शहर कार्यकारिणी सदस्य अतुल दिघे,अमोल शिंदे, शंकर ठाकूर, कैलास मगर, विनय तिवारी, माधुरी मराठे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

बारामती कृषी विद्यार्थ्यांची नवी दिल्ली येथे शैक्षणिक भेट

■ शारदानगर (दै. संध्या)



डॉ. शरदचंद्र पवार कृषी व संलग्न महाविद्यालय बारामतीतील पदवी अभ्यासक्रमाच्या ४८ विद्यार्थ्यांनी भारतीय कृषी संशोधन संस्था (IARI),नवी दिल्ली येथे शैक्षणिक भेट देऊन कृषी संशोधन व आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती घेतली. या शैक्षणिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी भारतीय कृषी संशोधन संस्था (IARI) मधील विविध विभाग,ग्रंथालय,संशोधन केंद्रे तसेच प्रक्षेत्रावरील सुरू असलेल्या विविध संशोधन प्रयोगांची पाहणी केली.विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रातील आधुनिक संशोधन,नवीन तंत्रज्ञान, पीक सुधारणा,प्रयोगपद्धती तसेच संशोधनाच्या विविध टप्प्यांविषयी सविस्तर माहिती मिळाली.यावेळी डॉ.गिरीजेश माहरा यांनी विद्यार्थ्यांना विविध कृषी संशोधन विषयांबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी संशोधनातील आधुनिक पद्धती, कृषी क्षेत्रातील नव्या संधी तसेच विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन या विषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली. या शैक्षणिक दौऱ्याचे समन्वयक म्हणून प्रा. प्रवीण सरवळे,प्रा.शरद दळवे,प्रा.पल्लवी कोळेकर आणि डॉ.महेश गायकवाड यांनी जबाबदारी पार पाडली.

विद्यार्थ्यांना वर्गातील पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष संशोधनाचा अनुभव मिळावा आणि कृषी क्षेत्रातील बदलत्या तंत्रज्ञानाची ओळख व्हावी,या उद्देशाने या शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. हा दौरा संस्थेचे चेअरमन राजेंद्रदादा पवार व विश्वस्त सुनंदा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, संस्थेचे समन्वयक प्रा. आशिष रासकर,डॉ.शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल गोंडे तसेच कॉलेज ऑफ ॲग्रीबिझनेस मॅनेजमेंटच्या प्राचार्या प्रा.आरती भोईटे, प्रा.संदीप गायकवाड यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला.

या भेटीमुळे विद्यार्थ्यांना देशातील अग्रगण्य कृषी संशोधन संस्थेतील कार्यपद्धती, अत्याधुनिक संशोधन आणि प्रक्षेत्रीय प्रयोग जवळून समजून घेण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक भेटीबद्दल समाधान व्यक्त केले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

विकसित भारतासाठी युवा पिढीची बुद्धी, ऊर्जा व नवकल्पना महत्वपूर्ण

केंद्रीय राज्यमंत्री सतीशचंद्र दुबे यांचे मत; आर्यन्स ग्रुपतर्फे 'एडब्ल्यूटीआयएस २०२६', तंत्रज्ञान व नवकल्पना राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

"युवा पिढीची ऊर्जा, नवकल्पना यांतून विज्ञान-तंत्रज्ञान आणि हरित उर्जेच्या क्षेत्रात देश आत्मनिर्भरतेकडे वेगाने वाटचाल करीत आहे. विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी युवा पिढीने आपली बुद्धिमत्ता, ऊर्जा आणि नवकल्पनांचे विश्व देशाच्या प्रगतीसाठी उपयोगात आणावे," असे मत केंद्रीय कोळसा व खाण मंत्रालयाचे राज्यमंत्री सतीशचंद्र दुबे यांनी व्यक्त केले. विकासामुळे नागरिकांचे स्वास्थ्य अबाधित राहते व तीच स्वस्थ मानसिकता देशाला प्रगतीकडे अधिक वेगाने घेऊन जाणारी ठरेल, असेही ते म्हणाले.

अत्याधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, उद्योग आणि नवकल्पनांचा संगम घडवून आणणाऱ्या 'एडब्ल्यूटीआयएस २०२६', या तंत्रज्ञान व नवकल्पनाविषयक तीन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी दुबे बोलत होते. आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीजतर्फे आयोजित या परिषदेचे उद्घाटन हिंजवडी येथील हॉटेल विवांता येथे झाले. हरित उर्जा व जैवइंधन क्षेत्रातील तज्ज्ञ पद्मभूषण डॉ. ज्येष्ठराज जोशी, हायड्रोजन इंधन तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. रमण वेदराजन, 'इस्रो'चे उपसंचालक नवलकिशोर गुप्ता, आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीजचे अध्यक्ष मुकुंद जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोहर जगताप, सहकार्यकारी अध्यक्ष स्मिता शितोळे-जगताप आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

सतीशचंद्र दुबे म्हणाले, "विविध क्षेत्रांत देश आत्मनिर्भर कसा होईल, याचा विचार आणि कृती करणे ही युवा पिढीची जबाबदारी आहे. २०४७ मधील विकसित भारत या स्वप्नाच्या परिपूर्तीसाठी केंद्र सरकार प्रयत्नरत आहे. 'मेक इन इंडिया' अभियानामार्फत हे उद्दिष्ट गाठण्याचे प्रयत्न सर्व क्षेत्रांत सुरू आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात देशाची प्रगती वेगाने होत असून, सुईपासून जहाजबांधणी आणि सेमी कंडक्टर्स व अत्याधुनिक बॅटरीच्या निर्मितीपर्यंत आपला देश आत्मनिर्भरतेच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. शहर आणि गाव, यांच्यातील आधीचे अंतर, दुरावा आता संपत चालला असून, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि मूलभूत सुविधांच्या उपलब्धतेमुळे नागरी सुविधांचा विस्तार होत आहे. या पार्श्वभूमीवर, संपूर्ण भारतीय



बनावटीच्या निर्यातक्षम उत्पादनांची श्रेणी विस्तारण्यासाठी युवा पिढीने आपली बुद्धीमत्ता, उत्साह आणि नवकल्पनांचे योगदान संशोधन व निर्मितीसाठी द्यावे."

डॉ. ज्येष्ठराज जोशी यांनी हरित ऊर्जा तसेच जैवइंधन या विषयावर मार्गदर्शन केले. रिॲक्टर्सची निर्मिती जर आपण देशात केली, तर प्रत्येक रिॲक्टरमागे आपण १०० कोटी रुपये वाचवू शकतो. आयात केलेला एक रिॲक्टर १३५ कोटी रुपयांना पडतो. त्यामुळे या क्षेत्रातील मूलभूत गुंतवणुकीचा सकारात्मक विचार आणि कृती आवश्यक आहे. देशात लिक्विड, घन आणि वायू स्वरुपात जो बायोमास निर्माण होतो, तो ऊर्जेचा महाप्रचंड स्रोत आहे. जमिनीची मशागत आणि कस वाढवण्यासाठीही बायोमासचा वापर शक्य आहे. प्रयोगशाळांमध्ये सर्व चाचण्या यशस्वी झाल्या आहेत. आता प्रत्यक्ष व्यवहारात हे संशोधन वापरात आणण्यासाठी यंत्रणा गरजेची आहे. या क्षेत्रात प्रचंड संधी आहेत, पण आपण नवकल्पना राबविण्यात कमी पडत आहोत. त्यासाठी पारंपरिक मानसिकता बदलली पाहिजे, अशी माहिती त्यांनी दिली.

केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार राज्यमंत्री तोखण साहू यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मार्गदर्शन केले. तंत्रज्ञानाचा विकास, आधुनिकीकरण आणि नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार यावर त्यांनी भर दिला. तंत्रज्ञानाचा वापर औद्योगिक क्षेत्रापुरता मर्यादित न ठेवता सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठीही प्रभावीपणे करणे आवश्यक आहे. त्याचे लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून विविध प्रयत्न सुरू आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती, सेवा-सुविधांमध्ये सुधारणा आणि सर्वांगीण विकासाला चालना देण्याची गरज असल्याचे साहू यांनी नमूद केले.

नवलकिशोर गुप्ता म्हणाले, खासगी क्षेत्रातील कंपनीने हरित उर्जा आणि जैवइंधनासारख्या घटकांना मध्यवर्ती ठेवून राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करणे, दूरदृष्टीचे आणि कौतुकास्पद आहे. हायड्रोजनचा इंधन म्हणून वापर ही काळाची गरज आहे. विशेषतः अंतराळ विज्ञान क्षेत्रात हायड्रोजन इंधनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मोठ्या क्षमतेच्या रॉकेट प्रक्षेपणासाठी लागणारी महाप्रचंड इंधनऊर्जा हायड्रोजन पूर्ण करू शकतो. एकूणच उर्जेच्या वाढत्या गरजा आणि वापर, यांच्यात ताळमेळ साधण्यासाठी हायड्रोजन इंधनावरील संशोधन, तंत्रज्ञान आणि प्रत्यक्ष वापर, यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

डॉ. रमण वेदराजन यांनीही हायड्रोजनचा इंधन म्हणून वापर करण्यासाठीचे तंत्रज्ञान विकसित होण्याची गरज अधोरेखित केली. मनोहर जगताप यांनी स्वागतपर प्रास्ताविकात परिषदेच्या आयोजनामागील हेतू सांगितला. परिषदेची आखणी चार टप्प्यात केली आहे. पुण्यात दोन सत्रे होणार असून, दिल्ली आणि गुजरात येथे पुढील सत्रे आयोजित केली जाणार आहेत. आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया, या अभियानामार्फत आर्यन्स ग्रुपच्या विविध प्रकल्प, उत्पादने व नवकल्पनांचे सादरीकरण या परिषदेत होत आहे, असे ते म्हणाले.

उद्घाटनानंतर दुबे यांनी आर्यन्स ग्रुपतर्फे प्रदर्शित करण्यात आलेल्या विविध उत्पादनांची पाहणी करून माहिती घेतली. अबोली सुपेकर यांनी सूत्रसंचालन केले.

थोडक्यात पण महत्वाचे



मनपा कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही : सुनील शिंदे

पुणे : दैनिक संध्या

अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळावे तसेच कर्तव्य बजावताना त्यांच्यावर हल्ला, धमकी किंवा दबाव येऊ नये, यासाठी महापालिका प्रशासनाने ठोस सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नगरसेवक तथा राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली प्रभारी आयुक्त मा. प्रजित नायर यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. 7 ऑक्टोबर रोजी सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय, वडगाव बुद्रुक येथे अतिक्रमण निरीक्षक श्री. धम्मानंद सोपान गायकवाड कर्तव्य बजावत असताना त्यांच्यावर शिवीगाळ करून हल्ला करण्यात आला. या घटनेचा निषेध व्यक्त करत भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यकतेनुसार पोलीस संरक्षण, सुरक्षा व्यवस्था आणि विभागीय समन्वय वाढविण्याची मागणी सुनील शिंदे यांनी केली. तसेच अतिक्रमण विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन, Salary Slip, आवश्यक सुरक्षा साधने, PF व इतर कायदेशीर आणि सामाजिक सुरक्षा लाभ मिळावेत, अशी मागणीही करण्यात आली. "महापालिका कर्मचारी शहरासाठी प्रत्यक्ष मैदानात काम करतात. त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी प्रशासनाची आहे. कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही," असे सुनील शिंदे यांनी स्पष्ट केले. यावेळी शिष्टमंडळात संघटनेचे पदाधिकारी सीताराम चव्हाण, एस. के. पळसे, विशाल बागुल उपस्थित होते.

अर्थपूर्ण विकासासाठी अंतःप्रेरणा, कल्पनाशक्ती महत्त्वाची : आर. गोपालकृष्णन

पुणे : दैनिक संध्या

"अंतःप्रेरणा, कल्पनाशक्ती आणि नवोन्मेष यांचा योग्य समन्वय साधल्यास वैयक्तिक तसेच व्यावसायिक जीवनात अर्थपूर्ण आणि फलदायी विकास साधता येतो,"असे प्रतिपादन ज्येष्ठ उद्योगनेते, लेखक आणि स्तंभलेखक आर.गोपालकृष्णन यांनी केले.सिम्बायोसिस इंटरनॅशनल स्कूलच्या ईशान्य सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या अतःप्रेरणा, कल्पनाशक्ती आणि नवोन्मेष यांवरील चिंतन सत्रात ते बोलत होते. या कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ पूना डाउनटाउनच्या अध्यक्षा रोटेरियन शिखा मित्रा, रोटेरियन आरती ठक्कर, रोटेरियन परवीन मल्होत्रा, रोटेरियन आदित्य कुमार, रोटेरियन नरेश पॉल, डॉ.जॉली सिन्हा आणि रोटेरियन लछमन दास यांच्यासह विविध रोटरी क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. रोटेरियन आशीमा अगाशे यांनी उपस्थितांचे स्वागत करून वक्त्यांचा परिचय करून दिला. जवळपास सहा दशकांच्या व्यावसायिक अनुभवाचा दाखला देत आर. गोपालकृष्णन यांनी नेतृत्व, बोर्डरूममधील वर्तन, स्टार्टअप्स, मानवी स्वभाव आणि परिस्थितीकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याचे महत्त्व अधोरेखित केले."आपण जे पाहतो किंवा जाणतो त्यापलीकडे शक्यतांचे विशाल विश्व दडलेले आहे," असे सांगताना त्यांनी मानवी इंद्रियांच्या मर्यादा स्पष्ट केल्या. यासाठी त्यांनी कबुतरांच्या विलक्षण दिशाज्ञानाचे उदाहरण दिले. निरीक्षण, जिज्ञासा आणि अंतःप्रेरणेतून नव्या शक्यता ओळखता येतात, असे त्यांनी सांगितले.



आर्थ्रायटिस दिनानिमित्त मिशन आर्थ्रायटिस इंडिया आणि सेंटर फॉर ऱ्ह्युमॅटिक डिसीजेसचा जनजागृती कार्यक्रम संपन्न

■ पुणे (दै. संध्या)

जागतिक आर्थ्रायटिस दिनानिमित्त मिशन आर्थ्रायटिस इंडिया (माई) आणि सेंटर फॉर ऱ्ह्युमॅटिक डिसीजेस (सीआरडी) यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच पुण्यातील कॅम्प येथील द पूना क्लब येथे विशेष जनजागृती कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाची संकल्पना द मूव्हिंग फाउंडेशन - फूट अँड अँकल इन आर्थ्रायटिस ही होती.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया (पुणे शाखेच्या) उपाध्यक्ष ॲड.अवलोकिता माने या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या. याप्रसंगी माईच्या अध्यक्ष राणी पारसनीस, सचिव अबोली बुरांडे , सीआरडीचे संचालक आणि प्रमुख संधिवात तज्ज्ञ डॉ. अरविंद चोप्रा, संधिवात तज्ज्ञ डॉ. वैजयंती लागू जोशी आणि ऑर्थोटिक्स तज्ज्ञ संजीव कश्यप, माईच्या श्वेता कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी माईच्या वार्षिक स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

ॲड.अवलोकिता माने यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच आर्थ्रायटिसशी लढा देत जिद्दीने जीवन जगणाऱ्या काही रुग्णांचा सत्कार करून त्यांच्या धैर्याचा गौरव केला. ॲड.अवलोकिता माने यांच्या हस्ते श्रीकांत केसकर आणि डॉ. अरविंद चोप्रा यांच्या हस्ते गुरप्रीत सग्गु यांचा आर्थ्रायटिसशी धैर्याने लढा दिल्याबद्दल सत्कार करण्यात आला. माईच्या सचिव अबोली बुरांडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.



माईच्या अध्यक्ष राणी पारसनीस यांनी अध्यक्षीय भाषण केले. त्या म्हणाल्या की, आर्थ्रायटिससह जीवन जगणाऱ्या व्यक्तींना सहानुभूतीपेक्षा प्रत्यक्ष मदत आणि आधार देणे, तसेच त्यांना आत्मविश्वासाने आणि सामान्य, समाधानकारक जीवन जगण्यासाठी सक्षम करणे, ही संस्थेची मूलभूत भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संस्थेचे ब्रीदवाक्य "सहानुभूती नाही, केवळ साथ" या भूमिकेवर त्यांनी विशेष भर दिला.

कार्यक्रमात विविध वैद्यकीय आणि माहितीपर सत्रांचे आयोजन करण्यात आले. सीआरडीचे संचालक आणि प्रमुख संधिवात तज्ज्ञ डॉ. अरविंद चोप्रा, संधिवात तज्ज्ञ डॉ. वैजयंती लागू जोशी आणि ऑर्थोटिक्स तज्ज्ञ संजीव कश्यप यांनी मार्गदर्शन केले. या सत्रांमध्ये संधिवात व इतर ऱ्ह्युमॅटिक आजारांवरील उपचारपद्धती, त्यांचे व्यवस्थापन, पाय व घोट्यांच्या सांध्यांशी संबंधित समस्या तसेच हालचाली सुलभ करण्यासाठी आणि सांध्यांची योग्य ठेवण राखण्यासाठी ऑर्थोटिक्सचा वापर, त्याचे फायदे आणि प्रत्यक्ष उपयोग याबाबत माहिती देण्यात आली.

चॅरिटेबल ट्रस्ट म्हणून कार्यरत असलेले मिशन आर्थ्रायटिस इंडिया स्नायू व हाडांशी संबंधित आजारांविषयी जनजागृती करण्याबरोबरच रुग्णांना सर्वांगीण आधार देण्याचे काम करते. आर्थ्रायटिसबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करून रुग्णांना अधिक आत्मविश्वासाने आणि सन्मानाने जीवन जगता यावे, यासाठी संस्था सातत्याने कार्यरत आहे.

पुणे बुक फेअरचे प्रसेनजीत फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

"ज्ञानसमृद्ध समाजाची निर्मिती" या संकल्पनेवर आधारित २४व्या "पुणे बुक फेअर २०२६अर्थात "पुणे पुस्तक जत्रा" या न्यू इंग्लिश स्कूल मैदान,टिळक रोड,पुणे येथे भरलेल्या प्रदर्शनाचे उद्घाटन अधिसभा सदस्य सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रसेनजीत फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले.

या वेळी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे, अशोक पलांडे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री योगेश सोमण, साहित्यिक श्री रवींद्र गुर्जर, सुर्यदत्तचे प्रा.संजय चोरडीया, पुणे बुक पेअरचे संयोजक पी .एन.आर.राजन व शिरीष चिटणीस उपस्थित होते. हा वार्षिक आणि शैक्षणिक पुस्तक मेळावा, महाराष्ट्र साहित्य परिषद,आणि लोकमंगल समूह शिक्षणस्था यांच्या सहकार्याने आयोजित केला आहे. पी.एन.आर.राजन यांनी सर्वांचे स्वागत केले व पुणे बुक फेअर विषयी माहिती दिली. फडणवीस म्हणाले "पुस्तक वाचण्याने आपण समृध्द होतो.पुणे हे जगाचे बुक कॉपिटल व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. सतत २४ वर्षे पुस्तक प्रदर्शन भराविल्याबाद्दल पी एन आर राजन यांचे अभिनंदन केले." सुर्यदत्त तर्फे एकूण सहा हजार पुस्तकाचं मोफत वाटप करण्यात येणार असल्याचे डॉ संजय चोरडिया यांनी सांगितले.

गुर्जर यांनी ग्रंथालयातील वाचकांची संख्या कमी होत चालली आहे या बद्दल चिंता व्यक्त केली. वाचनाची इतकी सवय लावून घ्या कि एकवेळचे जेवण घेतले नाही तरी चालेल पण त्या पैशात एक पुस्तक खरेदी करा.पुस्तक वाचण्याचा आनंद आणि समाधान वेगळेच असते. जशी जुनी चित्रपट गीते आवडतात तसी जुनी पुस्तके वाचण्याची आवड निर्माण करा. जेन झी हि पिढी पुस्तकापासून दूर जात असल्याचे सांगितले. सध्या संग्रहित माहिती गुगल सारख्या ठिकाणी तयार मिळत असते.ती परिपूर्ण नसल्याने मित्रानो भरपूर वाचन करा.



ऑर्थो-प्लास्टिक उपचार दृष्टिकोनामुळे अपघातग्रस्त रूग्णाची प्रकृती पूर्ववत

■ पुणे (दै. संध्या)

भीषण अपघातात गंभीर दुखापत झालेल्या 60 वर्षीय रुग्णाचा पाय वाचवण्यात नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटर येथील डॉक्टरांना यश आले आहे. या उपचार प्रक्रियेचे नेतृत्व प्लास्टिक व रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जन डॉ. स्वामिनाथन रवी यांनी केले.

शिक्रापूर रस्त्यावर हा रुग्ण दुचाकीवरून प्रवास करत असताना त्यांच्या वाहनाला ट्रकने धडक दिली. या अपघातात ट्रकचे चाक त्यांच्या पायावरून गेल्याने पायाचे हाड मोडणे (कंपाऊंड फ्रॅक्चर), रक्तवाहिन्यांना दुखापत तसेच त्वचा, स्नायू आणि इतर मऊ ऊतींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरचे प्लास्टिक व रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जन डॉ. स्वामिनाथन रवी म्हणाले की, आम्ही ऑर्थो-प्लास्टिक उपचारपद्धतीचा अवलंब केला असून या उपचारांमध्ये दोन टप्प्यांचा समावेश होता. पहिल्या टप्प्यात जखमेतील खराब झालेल्या आणि दूषित ऊती काढून टाकण्याची प्रक्रिया करण्यात आली. तसेच संसर्गाचा धोका वाढवू शकणारे,सैल झालेले हाडांचे छोटे कण शस्त्रक्रियेद्वारे काढून टाकण्यात आले.या प्रक्रियेला थरो डेब्रीडमेंट असे म्हणतात. त्यानंतर बाह्य उपकरणाच्या (एक्सटर्नल फिक्सेटर) साहाय्याने फ्रॅक्चर स्थिर करण्यात आले. या प्रकियेत हाडामध्ये पिन बसवून त्या शरीराच्या बाहेर असलेल्या एका विशेष फ्रेमला जोडण्यात आले. त्यामुळे हाड योग्य स्थितीत ठेवता येते आणि डॉक्टरांना त्याच वेळी जखमेपर्यंत पोहचणे शक्य होते. यानंतर व्हॅक्यूम-असिस्टेड क्लोजर (व्हीएसी) थेरपी किंवा निगेटिव्ह प्रेशर वाऊंड थेरपी (एनपीडब्ल्यूटी) ही प्रक्रिया करण्यात आली. या उपचार पद्धतीत नियंत्रित सक्शन यंत्रणेद्वारे विशेष फोम ड्रेसिंग करण्यात आले. यामुळे जखमेतील अतिरिक्त द्रव बाहेर काढण्यास, निरोगी ऊतींची वाढ होण्यास आणि जखम भरून येण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत होते.

दुसऱ्या टप्प्यातील शस्त्रक्रिया 72 तासांच्या आत करण्यात आली. या प्रक्रियेला मायक्रोव्हॅस्क्युलर फ्री फ्लॅप असे म्हणतात. मायक्रोव्हॅस्क्युलर फ्री फ्लॅप ही मोठ्या आणि गुंतागुंतीच्या स्थितीमध्ये पुनर्रचना करण्यासाठी वापरली जाणारी ही अत्याधुनिक शस्त्रक्रिया आहे. या प्रक्रियेत रुग्णाच्या शरीराच्या एका भागातून त्वचा, स्नायू, चरबी किंवा हाडांसह आवश्यक निरोगी ऊती काढून दुखापत झालेल्या भागात रोपित केल्या जातात.

शस्त्रक्रियेसाठी मायक्रोस्कोपच्या मदतीने या ऊतींमधील लहान रक्तवाहिन्या जखमेच्या ठिकाणच्या रक्तवाहिन्यांशी जोडल्या जातात. त्यामुळे रोपित केलेल्या ऊतींना रक्तपुरवठा सुरू राहतो आणि त्या जिवंत राहण्यास मदत होते. या रुग्णाच्या उजव्या मांडीमधून सुमारे 30 बाय 18 सेंटीमीटर आकाराच्या ऊतींचा भाग घेऊन डाव्या पायावर त्यांचे रोपण करण्यात आले.

नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरच्या ट्रॉमा अँड स्पाइन विभागाचे प्रमुख डॉ. विशाल चौधरी म्हणाले की, ही प्रक्रिया अशा गंभीर परिस्थितीत उपयुक्त ठरते. फ्री फ्लॅप शस्त्रक्रियेमुळे अशा भागावर निरोगी रक्तपुरवठा असलेल्या ऊतींचे आवरण तयार करता येते. त्यामुळे मोठ्या जखमा भरून येण्यास मदत होते, तसेच सततचा संसर्ग होण्याचा धोका कमी करण्यास आणि दुखापत झालेला अवयव वाचवण्यास मदत होते.

डॉ. चौधरी पुढे म्हणाले की, सुमारे चार आठवड्यांत जखम भरून आल्यानंतर बाह्य फिक्सेटर काढून त्याऐवजी प्लेट आणि स्क्रूच्या साहाय्याने अंतर्गत फिक्सेशन करण्यात आले. या पद्धतीत हाडांच्या तुकड्यांना योग्य स्थितीत कायम ठेवण्यासाठी विशेष आकाराची धातूची प्लेट हाडावर बसवून स्क्रूच्या मदतीने घट्ट केली जाते.

सहा आठवड्यांनंतर रुग्णाने पायावर अंशतः वजन देऊन चालण्यास सुरुवात केली आहे. सध्या ते फिजिओथेरपी टीमच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पुनर्वसन उपचार घेत आहेत.

डॉ. स्वामिनाथन म्हणाले की, भारतातील ट्रॉमा उपचारांमध्ये ऑर्थो-प्लास्टिक उपचार पद्धतीचा वापर वाढत आहे. या पद्धतीत हाडांच्या दुखापती सोबत मऊ ऊतींच्या दुखापतीवरही उपचार करणे शक्य होते. यासाठी आर्थोपेडिक आणि प्लास्टिक सर्जन हे उपचारांच्या प्रत्येक टप्प्यावर समन्वय साधून काम करतात. तसेच भूलतज्ज्ञ, अतिदक्षता विभागातील तज्ज्ञ, संसर्ग नियंत्रण तज्ज्ञ आणि गरजेनुसार इतर वैद्यकीय तज्ज्ञांचीही मदत घेतली जाते.

फ्रॅक्चर स्थिर करणे आणि योग्य वेळी मऊ ऊतींची पुनर्रचना करणे यांचा समन्वय साधल्यामुळे जखम लवकर भरून येणे, गुंतागुंत कमी करणे आणि रुग्णाच्या पुनर्प्राप्तीस मदत होऊ शकते. मायक्रोव्हॅस्क्युलर पुनर्रचना आवश्यक असलेल्या गंभीर दुखापतींमध्ये वेळेवर उपचार करणे महत्त्वाचे असते. अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया शक्यतो अपघातानंतर 72 तासांच्या आत करणे अपेक्षित असते. त्यामुळे रुग्णाला वेळेत योग्य उपचार मिळण्यासाठी तज्ज्ञांकडे घेऊन जाणे आणि आवश्यक शस्त्रक्रिया कौशल्य व बहुवैद्यकीय उपचारांची सुविधा उपलब्ध असलेल्या टर्शरी केअर सेंटरमध्ये वेळेत दाखल करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

या उपचारांच्या टीममध्ये डॉ. स्वामिनाथन रवी यांच्यासह ट्रॉमा अँड स्पाइन विभागाचे प्रमुख डॉ.विशाल चौधरी, भूलतज्ज्ञ डॉ. संगीता चंद्रशेखर, प्लास्टिक सर्जन डॉ. मनोज पवार, आपत्कालीन विभागाचे प्रमुख डॉ.प्रथमेश राऊत आणि इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

> नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरचे उपव्यवस्थापकीय संचालक डॉ. दिविज माने म्हणाले की, गंभीर अपघातानंतर रुग्णाचा अवयव वाचवण्यासाठी वेळेवर उपचार, शस्त्रक्रियेतील कौशल्य आणि विविध वैद्यकीय शाखांमधील प्रभावी समन्वय अत्यंत आवश्यक असतो. या गुंतागुंतीच्या प्रक्रियेत ऑर्थो-प्लास्टिक उपचार पद्धतीचा अवलंब करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आमच्या ऑर्थोपेडिक आणि प्लास्टिक सर्जरी टीमचे मी अभिनंदन करतो. नोबल हॉस्पिटल्समध्ये रूग्ण लवकर बरा होणे व सुरक्षितपणे प्रकृती सुधारण्यास प्राधान्य दिले जाते. उपचारांमधील उद्भवणाऱ्या गुंतागुंती कमी करणे आणि त्यांना शक्य तितक्या लवकर शारीरिक कार्यक्षमता पुन्हा मिळवून देण्यावर आमचा भर असतो. त्यामुळे रुग्णांना त्यांच्या कामावर आणि दैनंदिन जीवनात लवकर परतता येते. गंभीर दुखापतींच्या उपचारांमध्ये विविध वैद्यकीय शाखांनी एकत्रितपणे काम केल्यास रुग्णाच्या उपचार प्रक्रियेत आणि पुनर्वसनात सकारात्मक सुधारणा घडवून आणता येते, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



शेतात पिकांना पाणी देताना सापाने घेतला चावा; मुलाचा दुर्दैवी अंत

सोलापुर : दैनिक संध्या

एका दुर्दैवी घटनेत एका तरुणाचा मृत्यू झाला. शेतात पिकांना पाणी देऊन झाडाखाली झोपलेल्या तरुण शेतकऱ्यास सापाने चावा घेतला. बेशुद्ध अवस्थेत त्या तरुणास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. रुपेश नागनाथ चव्हाण असे मयत तरुणाचे नाव आहे. रूपेश याची वागदरी येथे शेती आहे. रूपेश हा नेहमीप्रमाणे मंगळवारीही शेतात काम करण्यासाठी गेला. वडिलांसोबत बोलत तो शेतातील काम करीत होता. पिकांना पाणी देण्याचे झाल्यानंतर तो झाडाखाली झोपला असता त्यास सापाने चावा घेतला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर रूपेश याचे वडील नागनाथ यांनी त्याला बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी नळदुर्ग येथील सरकारी दवाखान्यात दाखल केले. मात्र प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने पुढील उपचारासाठी त्यास सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच तो मयत झाल्याचे डॉ. श्रीकृष्ण बागल यांनी सांगितले. मयत रूपेश हा दिवसा शेती करून रात्री भजन करत होता. त्याच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहीण असा परिवार आहे. रूपेशच्या निधनाची बातमी समजताच त्याच्या मित्रांनी शासकीय रुग्णालयात गर्दी केली होती. आई-वडिलांनी हंबरडा फोडला. मुलाला सर्पदंश केलेला साप चक्क शासकीय रुग्णालयात वडिलांनी सोबत आणला होता.

सोलापूर काँग्रेसचे आक्रमक निदर्शने; कार्यकर्ते अन् पोलिसात जोरदार झटापट

सोलापुर : दैनिक संध्या

मोदी सरकारला वोटचोरीसाठी मदत करणाऱ्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्ली येथे आंदोलन करणारे लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, खा. प्रियंका गांधी, खा. प्रणिती शिंदे यांच्यासह काँग्रेसच्या शेकडो खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याच्या निषेधार्थ सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन सोलापूर जवळ तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी मोदी सरकारच्या दडपशाहीचा निषेध करण्यात आला. या आंदोलनादरम्यान काँग्रेस पदाधिकारी आणि पोलिसांमध्ये झटापटही झाली. काही कार्यकर्त्यांचे कपडेही फाटले. यावेळी कार्यकर्त्यांनी "ज्ञानेश कुमार राजीनामा द्या, राहुल गांधी संघर्ष करो, हम तुम्हारे साथ हैं, प्रणिती शिंदे संघर्ष करो, हम तुम्हारे साथ हैं, सरकारकी हुकूमशाही नहीं चलेगी अशा जोरदार घोषणा देत परिसर दणाणून सोडला. मतदारांच्या अधिकारांचे रक्षण, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनामा, एसआयआर रद्द करणे, बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात यावेत या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, माजी महापौर संजय हेमगड्डी, अरिफ शेख, सुशीला आबुटे, बाबा मिस्त्री, नगरसेवक प्रा. नरसिंह आसादे, हणमंतु सायबोळु, महिलाध्यक्षा प्रमिला तूपलवंडे, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष जुबेरभाई कुरेशी, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, मागासवर्गीय विभाग अध्यक्ष सागर उबाळे, मीडिया सेल अध्यक्ष तिरुपती परकीपडंला आदी उपस्थित होते. लोकशाहीच्या मार्गाने प्रश्न विचारणाऱ्या विरोधकांना अटक करून सरकारला जनतेच्या प्रश्नांपासून पळ काढता येणार नाही. मतदारांच्या अधिकारांशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीसह निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी आमचा लढा सुरूच राहील, असेही काँग्रेसने स्पष्ट केले.

गाढविणीसोबत लावले लग्न अन् केली मारहाण

सोलापुर : दैनिक संध्या

पोलीस परवानगी नाकारलेली असतानाही सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाजवळील पूनम गेट येथे गाढविणीसोबत प्रतीकात्मक लग्न लावून प्राण्याचा छळ केल्याप्रकरणी एका तरुणावर सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास घटना घडली. आरोपी दीपक नारायण सूर्यवंशी याने या आंदोलनासाठी पोलिसांकडे रीतसर परवानगी मागितली होती. मात्र, पोलिसांनी त्याला परवानगी नाकारली होती, असे असूनही आरोपीने पोलिसांच्या आदेशाचे उल्लंघन करत बेकायदेशीर आंदोलन छेडले. आंदोलनादरम्यान त्याने एका गाढविणीला दोरीने अमानुषपणे बांधून ठेवत तिला मारहाण केली. प्राण्याला विनाकारण वेदना व त्रास देऊन त्याच्याशी क्रूरतेची वागणूक दिल्याचा आरोप त्याच्यावर आहे. या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस सहाय्यक फौजदार राजेंद्र मरगप्पा बनसोडे यांनी तक्रार दिली आहे. आरोपी दीपक सूर्यवंशी याच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार जाधव हे करत आहे.

Mivi One 5G ची सेल Flipkart BBD सोबत सुरू; किंमत ₹ 11,999 पासून

पुणे : दैनिक संध्या



ग्राहकोपयोगी तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतीय ब्रँड 'MIVI' ने आपला पहिला स्मार्टफोन - 'Mivi One 5G' - 'बिग बिलियन डेज' (BBD) सेल अंतर्गत केवळ 'फ्लिपकार्ट'वर (Flipkart) विक्रीसाठी उपलब्ध केला आहे. ८ ऑक्टोबरपासून ग्राहक हा स्मार्टफोन ११,९९९ रुपये या विशेष सणासुदीच्या किंमतीत खरेदी करू शकतील. "Pretty Powerful" (अत्यंत प्रभावी) अशी ओळख असलेला 'Mivi One 5G' हा स्मार्टफोन उत्कृष्ट कामगिरी (performance), आकर्षक डिझाइन आणि दैनंदिन वापरासाठीची अष्टपैलू उपयुक्तता यांचा सुरेख संगम साधतो. ग्राहकांची जीवनशैली, कामाची पद्धत आणि संपर्कात राहण्याची गरज लक्षात घेऊन हा स्मार्टफोन तयार करण्यात आला आहे. 'Mivi One 5G' केवळ फ्लिपकार्टवर उपलब्ध असेल. पात्र 'फ्लिपकार्ट प्लस' (Flipkart Plus), 'व्हीआयपी' (VIP) आणि 'ब्लॅक' (Black) सदस्य तसेच पात्र कार्डधारकांसाठी ८ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १२ वाजता 'अर्ली ॲक्सेस' (सुरुवातीची संधी) सुरू होईल, तर ९ ऑक्टोबर २०२६ पासून सर्वांसाठी विक्री खुली होईल. 'बिग बिलियन डेज' (BBD) अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या विशेष किंमती या लागू असलेल्या बँक ऑफर्सचा समावेश करून निश्चित केल्या आहेत आणि त्या फ्लिपकार्ट व संबंधित बँकांच्या अटी व शर्तींच्या अधीन आहेत. फ्लिपकार्ट बिग बिलियन डेज सेलदरम्यान, MIVI One 5G विशेष प्रभावी किमतीत उपलब्ध असेल, फ्लिपकार्ट 'बिग बिलियन डेज' सेलदरम्यान, MIVI One 5G विशेष प्रभावी किमतीत उपलब्ध असेल: ४GB + १२८GB व्हेरिएंटसाठी ₹११,९९९*, आणि अनुक्रमे ६GB + १२८GB व ८GB + १२८GB व्हेरिएंट्ससाठी ₹१३,४९९* व ₹१४,९९९*.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा!

कृषी कर्जांच्या पुनर्गठनाचे बँकांना निर्देश

- राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या विशेष बैठकीत निर्णय
- आगामी हंगामासाठी नवीन व अतिरिक्त कर्जपुरवठाही करणार

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र यांची विशेष बैठक पार पडली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) नैसर्गिक आपत्तीविषयक मार्गदर्शक तत्त्वांनुसार पात्र कृषी कर्जाचे पुनर्गठन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आला. तसेच आगामी पेरणी हंगामासाठी पात्र शेतकऱ्यांना नवीन आणि अतिरिक्त कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही सर्व सदस्य बँकांना देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि राज्यस्तरीय बँकर्स समितीचे अध्यक्ष तथा बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक प्रभात किरण यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळावी आणि आरबीआयच्या सवलत उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, हा बैठकीचा प्रमुख उद्देश होता.

बैठकीला भारत सरकारच्या वित्त सेवा विभागाचे सहसचिव आशिष मोरे, भारतीय रिझर्व्ह बँकेचे नागपूर येथील प्रादेशिक संचालक सचिन शेंडे, मुंबई येथील मुख्य महाव्यवस्थापक पुनीत पंचोली, महाराष्ट्र शासनाच्या सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, नाबार्डचे मुख्य महाव्यवस्थापक ए. व्ही. भवानीशंकर, राज्यस्तरीय बँकर्स समितीचे महाव्यवस्थापक तथा संयोजक विवेक नाचणे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी, सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील बँका, प्रादेशिक ग्रामीण बँकांचे प्रतिनिधी आणि सर्व जिल्ह्यांचे अग्रणी जिल्हा व्यवस्थापक उपस्थित होते.



कर्जफेडीसाठी शेतकऱ्यांना दिलासा

बैठकीत आरबीआयच्या नैसर्गिक आपत्तीविषयक मार्गदर्शक तत्त्वांनुसार पात्र कृषी कर्जखात्यांची निवड, कर्ज पुनर्गठनाची प्रक्रिया, अंमलबजावणीची कालमर्यादा आणि नियामक तरतुदींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दुष्काळामुळे प्रभावित झालेल्या आणि निर्धारित निकषांनुसार पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांच्या कृषी कर्जांचे पुनर्गठन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रक्रियेत कर्जफेडीच्या कालावधीचे नव्याने नियोजन करणे, थकीत व्याजाचे स्वतंत्र कर्जसुविधेत रूपांतर करणे आणि आवश्यकतेनुसार इतर सवलती देणे अशा उपाययोजनांचा समावेश असेल. या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना सर्व सदस्य बँकांना देण्यात आल्या आहेत.

आगामी हंगामासाठी नवीन कर्जपुरवठा

कर्ज पुनर्गठनाबरोबरच पात्र शेतकऱ्यांना आगामी पेरणी हंगामासाठी, शेती व संलग्न व्यवसायांसाठी तसेच खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नवीन अथवा अतिरिक्त कर्ज उपलब्ध करून देण्याबाबतही बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांना शेतीच्या कामांसाठी आवश्यक आर्थिक पाठबळ मिळण्यास मदत होणार आहे.

बँकांना तातडीने कार्यवाहीचे आदेश

भारत सरकारच्या वित्त सेवा विभागाचे सहसचिव आशिष मोरे यांनी पात्र कृषी कर्जखात्यांचे पुनर्गठन निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना बँकांना दिल्या. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी बँकांनी संवेदनशीलतेने आणि तत्परतेने कार्यवाही करण्याचे आवाहन केले.

राज्यस्तरीय बँकर्स समितीचे अध्यक्ष प्रभात किरण यांनीही सर्व सदस्य बँकांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सवलत उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे स्पष्ट केले.

दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जफेडीसाठी अधिक वेळ आणि आगामी हंगामासाठी नव्याने आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या बैठकीतील निर्णय महत्त्वपूर्ण मानले जात आहेत.

'सोयीनुसार रंग बदलणं म्हणजे काँग्रेसचं राजकारण' - रविंद्र चव्हाण

■ नवी दिल्ली (दै. संध्या)





भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काँग्रेसच्या दुटप्पी राजकारणावर टीका करणारी सोशल मीडिया पोस्ट शेअर केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा कोलकाता येथील व्हिडिओ शेअर करत त्यांनी काँग्रेसवर जोरदार घणाघात केला. पश्चिम बंगाल भाजप विधिमंडळाच्या बैठकीत केंद्रीय गृहमंत्री बोलत होते.

रविंद्र चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले की, 'सोयीनुसार रंग बदलणं म्हणजे काँग्रेसचं राजकारण! ज्या राज्यांमध्ये तब्बल ४०-४० वर्षे काँग्रेसचा मुख्यमंत्री होऊ शकला नाही, तिथे त्यांच्याच मित्रपक्षांची सत्ता होती. व्होट चोरीचा आरोप करणारे राहुल गांधी आणि काँग्रेस नेते याबद्दल तोंडातून 'ब्र' देखील काढणार नाहीत. 'चोराच्या उलट्या बोंबा' म्हणतात ते हेच!' दरम्यान, केंद्रीय गृहमंत्र्यांनी आपल्या भाषणात देशभरातील विविध राज्यांमध्ये किती वर्षांपासून काँग्रेसचा एकही मुख्यमंत्री झालेला नाही, याचा पाढा वाचला. ते म्हणाले की, 'काँग्रेसने या पराभवानंतर आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे. राहुल गांधी नेते झाल्यापासून देशातील नागरिक वेळोवेळी त्यांच्याविरोधात कौल देत आहेत आणि राहुलजींच्या नेतृत्वात 'इंडिया आघाडी' पुन्हा मोडण्यास सुरुवात झाली आहे.' काँग्रेसच्या या अपयशावर बोट ठेवताना, रविंद्र चव्हाण यांनी पुन्हा एकदा भाजपची भूमिका ठामपणे मांडली.

भरत जाधव आणि पुष्कर श्रोत्री न्यायाच्या रणांगणात आमनेसामने!

- 'कोण यशवंत पानसरे?' मालिकेचा १६ ऑक्टोबरला मराठी झी५वर प्रीमियर
- न्याय, सत्ता आणि सत्याचा थरार उलगडणार

■ मुंबई (दै. संध्या)

मराठी मनोरंजनविश्वातील लोकप्रिय अभिनेते भरत जाधव आणि पुष्कर श्रोत्री प्रथमच एका वेगळ्या न्यायालयीन संघर्षाच्या निमित्ताने आमनेसामने येणार आहेत. 'कोण यशवंत पानसरे?' या नव्या मराठी मालिकेतून न्याय, सत्ता आणि सत्य यांच्यातील संघर्ष प्रेक्षकांसमोर उलगडणार आहे. न्यायालयीन नाट्य आणि तपासाचा थरार असलेल्या या मालिकेचा प्रीमियर १६ ऑक्टोबर २०२६ रोजी मराठी झी५वर होणार आहे. आनंद दिलीप गोखले यांनी लिहिलेल्या आणि दिग्दर्शित केलेल्या या मालिकेची निर्मिती मंजिरी सुबोध भावे यांच्या कान्हाज् मॅजिक या निर्मितीसंस्थेने केली आहे. समीक्षकांची प्रशंसा मिळालेल्या तमिळ मालिकेवर आधारित असलेली ही कथा एका अपयशी वकिलाच्या संघर्षाचा, आत्मविश्वासाच्या पुनर्शोधाचा आणि न्यायासाठीच्या लढ्याचा वेध घेते. यशवंत पानसरे हा एकेकाळचा प्रभावी वकील. आयुष्यातील एका मोठ्या अपयशानंतर तो नोटरी म्हणून काम करत असून,



अपराधीपणा आणि आत्मसंशयाच्या गर्तेत अडकला आहे. मात्र, बेपत्ता झालेल्या अलकाच्या प्रकरणामुळे त्याच्या आयुष्याला अनपेक्षित वळण मिळते. अलकाचे वडील सदाशिव मापारी हे तपास यंत्रणेच्या अपयशामुळे हताश होऊन न्यायालयाबाहेर स्वतःला पेटवून घेतात. या घटनेने हादरलेला पानसरे न्यायासाठी पुढाकार घेत जनहित याचिका दाखल करतो. या लढ्यात त्याला निर्भय तरुण वकील जान्हवीची साथ मिळते. त्यानंतर सुरू होणारा संघर्ष केवळ न्यायालयापुरता मर्यादित राहत नाही, तर शक्तिशाली संस्था, राजकीय प्रभाव आणि व्यवस्थेतील त्रुटींनाही आव्हान देतो. यशवंत पानसरे यांच्या भूमिकेबद्दल बोलताना भरत जाधव यांनी सांगितले की, भूतकाळातील अपयशाचे ओझे वाहणाऱ्या आणि स्वतःवरील विश्वास गमावलेल्या व्यक्तीचा प्रवास साकारणे हा वेगळा अनुभव आहे. पानसरे अचानक नायक बनत नाही, तर समोर घडणाऱ्या अन्यायाकडे दुर्लक्ष करता येत नसल्याने पुन्हा संघर्षात उतरतो.

सोमय्या विद्याविहार विद्यापीठाचा पाचवा दीक्षांत समारंभ संपन्न



- विविध विद्याशाखांमधील शैक्षणिक उत्कृष्टतेचा गौरव

■ पुणे (दै. संध्या)

सोमय्या विद्याविहार विद्यापीठाने (एसव्हीयू) आपला पाचवा दीक्षांत समारंभ विद्यापीठ परिसरातील गार्गी प्लाझा येथे आयोजित केला. विविध विद्याशाखांमधील पदवीधर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा या समारंभात गौरव करण्यात आला. विद्यार्थी शैक्षणिक प्रवासातून व्यावसायिक आणि सामाजिक जीवनाकडे वाटचाल करत असताना, त्यांच्यामध्ये व्यावसायिक उत्कृष्टता (पेशा), व्यापक विचार (सोच) आणि सशक्त चारित्र्य (चरित्र) जोपासण्याचा विद्यापीठाचा दृष्टिकोन या समारंभातून प्रतिबिंबित झाला. या समारंभाला सोमय्या विद्याविहार विद्यापीठाचे कुलपती श्री. समीर सोमय्या, कुलगुरू प्रा. अजय कपूर, कुलसचिव प्रा. नंदकुमार गिलके यांच्यासह प्राध्यापक, पदवीधर विद्यार्थी आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयांतर्गत लष्करी व्यवहार विभागाचे माजी अतिरिक्त सचिव व्हाइस ॲडमिरल अतुल आनंद, पीव्हीएसएम, एव्हीएसएम, व्हीएसएम (निवृत्त) हे या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. विद्यापीठाच्या बहुविद्याशाखीय शैक्षणिक परिसंस्थेचे प्रतिबिंब म्हणून, मुख्य दीक्षांत समारंभानंतर नऊ शैक्षणिक गटांमध्ये विद्याशाखानिहाय पदवी वितरण समारंभ पार पडले. पदवीधर विद्यार्थी व्यवस्थापन; अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान; शिक्षण; धर्म अभ्यास; वाणिज्य आणि व्यवसाय अभ्यास; मूलभूत आणि उपयोजित विज्ञान; मानव्यविद्या आणि सामाजिक शास्त्रे; संगीत आणि प्रयोगात्मक कला; तसेच क्रीडा अशा विविध क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करत होते.

KONE कडून भारतातील पहिल्या डिजिटल एक्सपिरियन्स सेंटरचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)



KONE या लिफ्ट आणि एस्केलेटर उद्योगातील जागतिक आघाडीच्या कंपनीने आज पुण्यामध्ये भारतातील पहिल्या KONE डिजिटल एक्सपिरियन्स सेंटरचे (डीईसी) उद्घाटन केले. हा टप्पा KONE च्या डिजिटल परिवर्तनाच्या प्रवासातील आणि तंत्रज्ञान, डेटा व नाविन्यपूर्णतेच्या माध्यमातून ग्राहकांना सर्वोत्तम अनुभव देण्याप्रतीच्या कटिबद्धतेमधील महत्त्वाचा ठरला आहे. या केंद्राचे उद्घाटन KONE कॉर्पोरेशनचे एक्झिक्युटिव्ह व्हाइस चेअर जुस्सी हेरलिन, KONE चे प्रेसिडेंट आणि सीईओ फिलिप डेलॉर्म यांच्यासह इन्फोसिसचे सह-संस्थापक आणि बोर्डाचे चेअरमन नंदन निलेकणी यांच्या हस्ते करण्यात आले. KONE डिजिटल एक्सपिरियन्स सेंटर ग्राहकांसाठी सर्वसमावेशक केंद्र आहे, जिथे ग्राहक पिपल फ्लो™ आणि स्मार्ट इमारतींचे भविष्य घडवणाऱ्या डिजिटल क्षमता पाहू शकतात, अनुभवू शकतात आणि त्यांच्याशी संवाद साधू शकतात. डिजिटलायझेशन, कनेक्टिव्हिटी, एआय आणि डेटा-आधारित अंतर्दृष्टी संपूर्ण इमारतीच्या जीवनचक्रात कसे मूल्य निर्माण करू शकतात.

पुण्यात नवीन ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटरचे उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)



थिसेनक्रुप ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजीने भारतातील पुणे येथे आपल्या नवीन ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटरचे (जीसीसी) अधिकृत उद्घाटन केले आहे. जागतिक संशोधन आणि विकास नेटवर्कच्या विस्ताराच्या दिशेने हे आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे. सुरुवातीच्या उभारणीच्या टप्प्यानंतर, आंतरराष्ट्रीय ग्राहकांसाठीच्या प्रकल्पांमध्ये सॉफ्टवेअर, हार्डवेअर, सिस्टीम्स आणि मेकॅनिकल डेव्हलपमेंट क्षेत्रात एकशे वीसहून अधिक अभियंते या केंद्रात कार्यरत आहेत. आगामी काही वर्षांत पुण्यातील टीमची संख्या तीनशेहून अधिक कर्मचाऱ्यांपर्यंत वाढविण्याची कंपनीची योजना आहे.

वाहने अधिकाधिक सॉफ्टवेअर-आधारित, कनेक्टेड आणि स्वयंचलित होत असताना महत्त्व प्राप्त करणाऱ्या क्षेत्रांमधील थिसेनक्रुप ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजीची क्षमता या नवीन केंद्रामुळे अधिक मजबूत होणार आहे. एम्बेडेड सिस्टीम्स, फंक्शनल सेफ्टी, सायबरसिक्युरिटी आणि प्रगत चॅसिस तंत्रज्ञान ही यातील प्रमुख कार्यक्षेत्रे आहेत. पुण्यातील अभियंते आंतरराष्ट्रीय विकास टीम्ससोबत जवळून काम करतात आणि संपूर्ण विकास प्रक्रियेदरम्यान जागतिक ग्राहक प्रकल्पांमध्ये योगदान देतात. यामध्ये स्टीअरिंग आणि चॅसिस सिस्टीम्सच्या पुढील पिढीसाठीच्या तंत्रज्ञानाचाही समावेश आहे.

"ऑटोमोटिव्ह उद्योगातील परिवर्तन हे सॉफ्टवेअर, इलेक्ट्रॉनिक्स आणि जागतिक स्तरावर परस्पर जोडलेल्या अभियांत्रिकी टीम्समुळे अधिकाधिक प्रेरित होत आहे. पुण्यातील आमच्या नवीन केंद्रामुळे आम्ही याच क्षमतांना अधिक बळकटी देत असून, जगभरातील आमच्या ग्राहकांसाठी अतिरिक्त विकास क्षमता निर्माण करत आहोत," असे थिसेनक्रुप ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीओओ) व्हिक्टर मोलनार यांनी सांगितले. "भारतामध्ये अभियांत्रिकी आणि सॉफ्टवेअर क्षेत्रातील उत्कृष्ट प्रतिभेचा मोठा साठा आहे आणि आमच्या जागतिक विकास नेटवर्कमध्ये भारताची भूमिका आगामी काळात अधिक महत्त्वाची ठरणार आहे." पुण्याची निवड येथील प्रस्थापित ऑटोमोटिव्ह उद्योग, मजबूत अभियांत्रिकी आणि सॉफ्टवेअर परिसंस्था, आघाडीची विद्यापीठे तसेच उच्च पात्रताधारक प्रतिभेचा व्यापक उपलब्ध साठा यामुळे करण्यात आली. हे केंद्र पुण्यातील बाणेर-बालेवाडी व्यवसाय जिल्ह्यातील सॉलिटेअर बिझनेस हब दोन येथे आहे. केंद्राचा विस्तार सुरू असताना, थिसेनक्रुप ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजी पुण्यातील आपल्या अभियांत्रिकी टीमला आणखी मजबूत करण्याची योजना आखत आहे. सुरुवातीला सॉफ्टवेअर, हार्डवेअर आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग क्षेत्रातील पदांसाठी भरतीवर लक्ष केंद्रित केले जाईल. भविष्यातील व्यवसाय आणि तंत्रज्ञानाच्या गरजांनुसार अतिरिक्त विशेष कौशल्यांचा समावेश केला जाईल. प्रतिभावान मनुष्यबळ आकर्षित करण्यासाठी आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी पुण्यातील विद्यापीठे आणि व्यापक अभियांत्रिकी परिसंस्थेसोबत सहकार्य करण्याच्या संधीही कंपनीला दिसत आहेत.

"पुणे आमच्यासाठी केवळ आणखी एक विकास केंद्र नाही. आम्ही येथे एक महत्त्वाचे अभियांत्रिकी केंद्र उभारत आहोत, जे आमच्या जागतिक संशोधन व विकास नेटवर्कमध्ये पूर्णपणे समाकलित आहे," असे थिसेनक्रुप ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजीच्या चॅसिस व्यवसायासाठी संशोधन व विकास विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. ब्योर्न एर्बे यांनी सांगितले. "भारतातील मजबूत अभियांत्रिकी कौशल्याला आमच्या जागतिक तंत्रज्ञान क्षमतांसोबत एकत्र करून, आम्ही विकासात्मक उपक्रमांचा विस्तार करू शकतो, महत्त्वाच्या कौशल्यांना अधिक बळकटी देऊ शकतो आणि जगभरातील आमच्या ग्राहकांसाठी उपाययोजनांची गती वाढवू शकतो." नवीन ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर हा थिसेनक्रुप ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजीच्या भारतातील व्यापक विस्ताराचा एक भाग आहे. अभियांत्रिकीच्या पलीकडे, कंपनीसाठी भारत एक वाढत्या महत्त्वाचे सोर्सिंग केंद्र बनत आहे. भारतीय ऑटोमोटिव्ह उत्पादकांसोबतची उपस्थिती मजबूत करण्यासाठी आणि स्थानिक बाजारपेठेत अतिरिक्त व्यावसायिक संधी विकसित करण्यासाठी थिसेनक्रुप ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजी पुण्यात विक्री टीमदेखील स्थापन करत आहे.



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



SIR रद्द करा, मतपत्रिकेद्वारे निवडणुका घ्या; 'लोकशाही बचाव मार्च'मधून इंडिया आघाडीची मागणी

पिंपरी : दैनिक संध्या

लोकशाही आणि संविधानाच्या संरक्षणासाठी तसेच निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता व निष्पक्षता राखण्याच्या मागणीसाठी पिंपरी-चिंचवड इंडिया आघाडी, सिव्हिल सोसायटी, पुरोगामी व सामाजिक संघटनांच्या वतीने गुरुवारी (दि. ८) 'लोकशाही बचाव मार्च'चे आयोजन करण्यात आले. आकुर्डी गाव येथील विठ्ठल मंदिरापासून निगडी येथील तहसीलदार कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या मोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मार्चमध्ये नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. "लोकशाही वाचवा, संविधान वाचवा", "SIR रद्द करा", "मतदारांचा हक्क अबाधित ठेवा" आणि "मतपत्रिकेद्वारे निवडणुका घ्या" अशा घोषणा देत आंदोलनकर्त्यांनी आपला निषेध व्यक्त केला. मोर्चानंतर तहसीलदारांमार्फत शासनाला निवेदन देण्यात आले. निवेदनाद्वारे SIR प्रक्रिया रद्द करणे, मतदारांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करणे आणि निवडणूक प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणण्याची मागणी करण्यात आली. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील यांनी मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा केंद्रबिंदू असल्याचे सांगत कोणत्याही पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीतून चुकीच्या पद्धतीने वगळले जाऊ नये, अशी भूमिका मांडली. काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांनीही केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर टीका करत लोकशाही व संविधान रक्षणासाठी संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. SIR प्रक्रिया रद्द होईपर्यंत आणि संबंधित मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू राहील, असे त्यांनी सांगितले. या आंदोलनात सामाजिक चळवळीचे नेते मानव कांबळे, मारुती भापकर, शिवसेनेचे माजी आमदार गौतम चाबुकस्वार, काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे, शिवसेनेचे शहरप्रमुख चेतन पवार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) शहराध्यक्ष देवेंद्र तायडे, मनसेचे अध्यक्ष सचिन चिखले, आपचे पदाधिकारी, सीपीआय(एम)चे कॉम्रेड अजित अभ्यंकर, सीपीआयचे गणेश दराडे, भगतसिंग विद्यार्थी संघटनेच्या स्वप्नजा काळे यांच्यासह विविध पक्ष व संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी इशारा देताना सांगितले की, शासनाने मागण्यांवर सकारात्मक निर्णय न घेतल्यास लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी भविष्यात आणखी व्यापक लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल.

ज्येष्ठ सिनेअभिनेते रंगकर्मी पद्मश्री नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण

पिंपरी : दैनिक संध्या

चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेते पद्मश्री नाना पाटेकर यांचे गुरुवार, दि. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाच्या ७७ व्या वर्षी गोवा येथे निधन झाले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सध्या साजरा करण्यात येत असलेल्या 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'मध्ये चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यात आला. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, गझलगायक आशिष मुजुमदार, ग्रंथालय प्रमुख प्रतिभा मुनावत, ग्रंथपाल राजू मोहन, प्रवीण चाबुकस्वार, वर्षा जाधव, निदेशक रवींद्र ओव्हाळ, योगिता कोठावदे, बबिता गावंडे, व्ही. आर. कुंभार, शिक्षक गणेश लिंगडे यांच्यासह नागरिक उपस्थित होते. उपस्थितांनी नाना पाटेकर यांच्या कलाक्षेत्रातील योगदानाचे स्मरण करत त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. ज्येष्ठ सिनेअभिनेते, दिग्दर्शक आणि पद्मश्री पुरस्कार विजेते नाना पाटेकर यांच्या दुःखद निधनाने मराठी तसेच हिंदी चित्रपटसृष्टीसह रंगभूमी आणि कलाक्षेत्राची मोठी हानी झाली आहे. मराठी रंगभूमीवरून अभिनयाला सुरुवात करणाऱ्या नाना पाटेकर यांनी अनेक मराठी नाटकांमधून तसेच चित्रपटांमधून विविध भूमिका साकारल्या. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने हिंदी सिनेसृष्टीतही आपल्या अभिनयाचा स्वतंत्र ठसा उमटविला. अभिनय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसेच पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. संवेदनशील असलेल्या या मराठमोळ्या अभिनेत्याने सामाजिक बांधिलकी जपत नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम देखील राबवले. मराठी भाषा समृद्धीसाठी आपल्या कलेच्या माध्यमातून नाना पाटेकर यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण करून अभिजात मराठी भाषा सप्ताह कार्यक्रमात त्यांना रसिकांच्या उपस्थितीत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

२५०० कार्यकर्त्यांच्या भव्य उपस्थितीत 'सेवा ज्योती यात्रा' व 'विकसित भारत संकल्प सभा' उत्साहात

पिंपरी : दैनिक संध्या

पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या समृद्ध, सशक्त आणि 'आत्मनिर्भर भारता'च्या संकल्पनेला नवी गती देण्यासाठी भोसरी येथे भव्य-दिव्य वातावरणात 'सेवा ज्योती यात्रा' आणि 'विकसित भारत संकल्प सभा' अत्यंत उत्साहात व दिमाखात पार पडली. '२५ वर्षे जनसेवेतून राष्ट्रसेवा' या उदात्त ध्येयाने प्रेरित होऊन आयोजित या ऐतिहासिक सोहळ्यात भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष श्री. शत्रुघ्न (बापू) काटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांचे डिजिटल माध्यमातून झालेले मार्गदर्शन. लाईव्ह स्क्रीनच्या माध्यमातून झालेल्या या संवादातून उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना जनसेवा, राष्ट्रनिर्माण आणि विकसित भारताच्या ध्येयासाठी योगदान देण्याचा संदेश देण्यात आला. "मोदीजींच्या नेतृत्वाखालील २५ वर्षांची जनसेवा हीच राष्ट्रसेवेची खरी प्रेरणा!" "पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेबांचा सार्वजनिक सेवेतील २५ वर्षांचा प्रवास हा केवळ राजकीय प्रवास नसून, तो या देशाच्या पुनरुत्थानाचा आणि जनसेवेचा महायज्ञ आहे. 'सेवा ज्योती यात्रे'च्या माध्यमातून पेटवलेली ही सेवेची ज्योत पिंपरी- चिंचवडच्या घराघरांत पोहोचवून 'विकसित भारत'चे स्वप्न साकार करण्यासाठी पिंपरी- चिंचवड शहर भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता कटिबद्ध आहे. पंतप्रधान मोदीजी आणि राष्ट्रीय अध्यक्ष श्री. नितीन नबीनजी यांच्या मार्गदर्शनाने आम्हा सर्व कार्यकर्त्यांमध्ये एक नवी ऊर्जा आणि उत्साह संचारला आहे." या राज्यस्तरीय स्वरूपाच्या महासभेला शहरातील साधारण २,५०० हून अधिक कार्यकर्ते, महिला व नागरिक उत्स्फूर्तपणे उपस्थित होते. संपूर्ण सभा परिसर 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

स्मार्ट सिटीच्या खांबांना जाहिरात फलकांचा विळखा

■ पिंपळे गुरव : (दै. संध्या)

नागरिकांना जागतिक दर्जाच्या सुविधा मिळाव्यात आणि शहराचा चेहरामोहरा बदलावा, या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'स्मार्ट सिटी' प्रकल्पांतर्गत कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करण्यात आली. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या स्मार्ट सुविधांना आता अनधिकृत जाहिरातींचा विळखा पडला आहे. पिंपळे गुरव येथील कल्पतरू सोसायटीशेजारील सुंदर पदपथावरील 'स्मार्ट खांब' सध्या खासगी फ्लेक्सबाजीचे केंद्र बनले असून, महापालिकेच्या सुशोभीकरणाच्या उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. स्मार्ट सिटी अभियानांतर्गत पिंपळे गुरव परिसरातील पदपथांचे सुशोभीकरण करून तेथे आकर्षक डिझाइनचे विद्युत दिवे आणि आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज 'स्मार्ट पोल' उभारण्यात आले. परंतु, सद्यस्थितीत यातील काही 'स्मार्ट पोल'वरील दिवेच गायब झाल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. विशेष म्हणजे, स्मार्ट सिटीच्या खांबांवर इमारतींच्या जाहिरातींचे मोठे फ्लेक्स लावण्यात आले आहेत. त्यासोबतच सेल्स ऑफिसचे फलकही याच खांबांवर लटकवण्यात आले आहेत. लाखो रुपये खर्चून उभारलेल्या या परिसराचा वापर आता केवळ खासगी व्यावसायिक जाहिरातींसाठी करत असल्याने पदपथाचे पूर्णपणे विद्रूपीकरण झाले आहे. पिंपळे गुरव परिसराची शोभा वाढविण्यासाठी नागरिकांच्या कररूपातील लाखो रुपयांचा निधी या प्रकल्पावर खर्च करण्यात आला. मात्र, आज याच ठिकाणी विद्युत दिव्यांची दुरवस्था आणि खांबांवर चोहोबाजूला लटकणारे बेकायदेशीर फ्लेक्स पाहून नागरिकांमधून प्रचंड संताप व्यक्त होत आहे. सुशोभीकरणाच्या नावाखाली उभारलेल्या या सुविधा खासगी बिल्डर्स आणि सेल्स ऑफिसच्या जाहिरातींसाठी आहेत का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. परिसराचे सौंदर्य पूर्ववत करण्यासाठी प्रशासनाने तातडीने विशेष मोहीम राबवून खांबांवरील इमारतींच्या जाहिरातींचे विद्रूप फ्लेक्स व सेल्स ऑफिसचे फलक त्वरित हटवावेत. तसेच गायब झालेले दिवे नवीन बसवून, पुन्हा असे प्रकार घडू नयेत म्हणून संबंधित जाहिरातदारांवर कठोर कायदेशीर उपाययोजना करावी, अशी तीव्र मागणी पिंपळे गुरव येथील नागरिकांकडून केली जात आहे. एकीकडे शहराच्या सौंदर्यीकरणाचा डांगोरा पिटणारे महापालिका व स्मार्ट सिटी प्रशासन दुसरीकडे या उघड्या डोळ्यांनी चाललेल्या प्रकाराकडे पूर्णपणे काणाडोळा करत आहे. गायब झालेल्या दिव्यांची देखभाल करणे आणि खांबांवर लावलेले अनधिकृत फ्लेक्स हटवणे, यावर संबंधित विभागाचे काही नियंत्रण आहे की नाही, असा थेट प्रश्न स्थानिक रहिवासी विचारत आहेत.




पिंपरी-चिंचवडकरांनो, पाणी जपून वापरा!

■ पिंपरी (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्यात एल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमानात मोठी घट झाल्याने पुढील वर्षभराचा विचार करता शहरात 31 ऑगस्ट 2027 पर्यंत दहा टक्के पाणीकपात सुरू ठेवण्याचे निर्देश खडकवासला पाटबंधारे विभागाने पिंपरी-चिंचवड महापालिकेस दिले आहेत.

त्यामुळे तब्बल वर्षभर शहरवासीयांना पाणीकपातीचा सामना करावा लागणार आहे. तसेच, पाण्याची नासाडी व अपव्यय टाळून बचतीला प्राधान्य द्यावे लागणार आहे. शहराला सध्यस्थितीत पवना धरणातून 540 एमएलडी, आंद्रा धरणातून 95 एमएलडी आणि एमआयडीसीकडून 30 एमएलडी असा एकूण 665 एमएलडी पाणीपुरवठा दररोज सुरू आहे. शहराला 25 नोव्हेंबर 2019 पासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे.

राज्यात यंदा पावसाने मोठी ओढ दिल्याने दुष्काळाचे चित्र अधिक गडद झाले आहे. राज्यातील आणि पुणे जिल्ह्यात काही तालुक्यात सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. एल निनोच्या प्रभावामुळे राज्यातील



विविध भागात पर्जन्यमानात मोठी घट झाली आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 31 ऑगस्ट 2027 पर्यंत दहा टक्के पाणीकपात कायम ठेवण्याचे निर्देश पाटबंधारे विभागाने महापालिकेस दिले आहेत. त्यानुसार महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून पिंपरी-चिंचवड शहरात पूर्वीपासूनच अंमलबजावणी सुरू आहे.

मात्र, महापालिकेसाठी पवना आणि आंद्रा धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामध्ये कपात झाल्यास शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा अपव्यय व नासाडी न करता पाण्याचा काटकसरीने वापर करण्यास प्राधान्य द्यावे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांचे मत आहे.

शहराला मागणीच्या तुलनेत कमी प्रमाणात पाणी मिळत आहे. सध्या सुरू असलेल्या दहा टक्के पाणीकपात पुढील वर्षी ऑगस्टपर्यंत कायम राहणार आहे. नागरिकांनी पाण्याची नासाडी तसेच, अपव्यय टाळावा. पाण्याचा काटकसरीने वापर करावा.

जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत एम. एम. महाविद्यालयाचे घवघवीत यश

■ भोसरी (दै. संध्या)

जिल्हा क्रीडा परिषद, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने इंद्रायणीनगर, भोसरी येथील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलात आयोजित जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत एम. एम. वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, काळेवाडीच्या १९ वर्षांखालील मुला-मुलींनी घवघवीत यश संपादन केले. विविध मैदानी क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करत खेळाडूंनी महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला असून, त्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेतील यशस्वी खेळाडू ट्रिपल जंप : कौशल्य जगताप याने प्रथम, तर गणेश गायकवाड याने द्वितीय क्रमांक पटकावला. ४०० मीटर धावणे : समर्थ जाधव याने द्वितीय क्रमांक मिळविला.

डिस्कस थ्रो : दानिश शेख याने द्वितीय क्रमांक मिळविला. ४०० मीटर हर्डल्स : दानिश शेख याने प्रथम क्रमांक पटकावला. ५ किलोमीटर चालणे : कौशल्य जगताप याने प्रथम क्रमांक मिळविला. १०० मीटर हर्डल्स : ओमकार जाधव याने तृतीय क्रमांक पटकावला. ४X४०० मीटर रिले : दानिश शेख, समर्थ जाधव, कुणाल मिस्त्री, आयुष भुजबळ आणि कौशल्य जगताप यांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळविला.

भालाफेक : दानिश शेख याने द्वितीय क्रमांक मिळविला. ३ किलोमीटर चालणे: भक्ती वाईकर हिने द्वितीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेतील यशामुळे सर्व संबंधित खेळाडूंनी विभागीय स्पर्धेत प्रवेश निश्चित केला आहे.

खेळाडूंनी दाखविलेली जिद्द, मेहनत आणि सातत्य यामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात भर पडली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल मराठवाडा मित्र मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब जाधव, महाविद्यालयाच्या प्राचार्या पद्मावती जट्टे, प्रा. संदीप सावळे, क्रीडा शिक्षक रामेश्वर हराळे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

चिखलीत महापालिकेची मोठी कारवाई

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चिखली येथील प्रभाग क्रमांक १ मध्ये अनधिकृत बांधकामांविरोधात मोठी कारवाई करण्यात आली. 'फ' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत करण्यात आलेल्या या कारवाईत एकूण पाच अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली असून, सुमारे १२०० चौरस मीटर क्षेत्रावरील बांधकाम हटविण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली. 'फ' क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अतुल पाटील यांच्या अधिपत्याखाली कारवाईची मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत उपअभियंता हेमंत घोड, बीट निरीक्षक साईनाथ देसाई, प्रफुल भोकरे, ऐश्वर्या मासाळ, सूरज माने यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. कारवाईदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहा



अतिक्रमण पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे ५० जवान, महापालिकेचे दोन मजूर आणि १० कंत्राटी मजूर तैनात करण्यात आले होते. अनधिकृत बांधकामे हटविण्यासाठी दोन ट्रॅक्टर, दोन ब्रेकर आणि दोन जेसीबी यंत्रांचा वापर करण्यात आला होता.

अनधिकृत फ्लेक्स आणि बॅनर लावणाऱ्यांनो सावधान! १.२१ लाख जाहिरातींवर कारवाई

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृतपणे जाहिरात होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर, किऑस्क लावून विद्रुपीकरण करणाऱ्यांवर महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने दंडात्मक कारवाई केली आहे. जानेवारी ते सप्टेंबर 2026 या नऊ महिन्यांत तब्बल 1 लाख 21 हजार 216 अनधिकृत जाहिरात होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर, किऑस्कवर कारवाई केली आहे.

तसेच, नागरिक आणि व्यावसायिकांकडून 13 लाख 37 हजार 100 रुपयांचा दंड वसूल केला असून, तीन गुन्हे दाखल केले आहेत. यापुढेही अनधिकृतपणे जाहिराती करणाऱ्यांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी दिला आहे. शहरात सुमारे 1 हजार 600 पेक्षा अधिक अधिकृत जाहिरात



होर्डिंग आहेत. शहरातील सार्वजनिक ठिकाणी लग्न, वाढदिवस, स्वागत, निवडणूक, धार्मिक व अन्य कार्यक्रमांचे फ्लेक्स व फलक लावले जातात. यामुळे शहर विद्रुप होत असून, वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे अशा प्रकारच्या फ्लेक्स, होर्डिंग, किऑक्स व फलकांवर दहाही क्षेत्रीय कार्यालयाच्या पथकांकडून कारवाई केली जात आहे. त्याबाबत सर्व राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी व शहराध्यक्षांनाही सूचित करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही शहरातील विविध भागात अनधिकृत जाहिराती लावल्या जात आहेत. आगामी काळात नवरात्रोत्सव, दसरा व दिवाळी असे सण व उत्सव आहेत. त्यामुळे राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी, विविध संस्था, संघटना अनधिकृतपणे जाहिरात करण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने कठोर भूमिका घेतली आहे.

आकाश चिन्ह व परवाना विभागाने 1 जानेवारी ते 30 सप्टेंबर 2026 या कालावधीत दहाही क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत अतिक्रमण पथकाने अनधिकृत होर्डिंग, पोस्टर्स, बॅनर्सवर कारवाईसाठी मोहीम राबविली. त्याअंतर्गत 1 लाख 21 हजार 216 अनधिकृत होर्डिंग, पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स, किऑक्सवर कारवाई करून ते जप्त करण्यात आले आहेत. शहर विद्रुप करणाऱ्या व्यावसायिक, नागरिकांकडून 13 लाख 37 हजार 100 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

तब्बल वीस कोटींचा खर्च, तरीही माहिती मिळेना! खासगी एजन्सीवर उधळपट्टीचा सिलसिला कायम

■ पिंपरी: (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विभागांच्या माहिती आणि आकडेवारीच्या आधारे वेगवेगळ्या प्रकारचे माहितीपत्र तयार करण्याचे काम एका खासगी संस्थेकडून सुरू आहे. त्यासाठी महिन्याला तब्बल साठ लाख रुपये तर, तीन वर्षांसाठी 20 कोटी 13 लाख खर्च केला जात आहे.

त्या कामासाठी 40 ते 50 कर्मचाऱ्यांऐवजी पाच ते दहा कर्मचारी नेमून महापालिकेची बोळवळ केली जात आहे.

माहितीपत्रकांची संख्याही नगण्य आहे. केवळ खासगी एजन्सी पोसण्यासाठीच माहिती व जनसंपर्क विभागाकडून सिटी हब फॉर डाटा ॲण्ड कम्युनिकेशन या गोंडस नावाने हा प्रकल्प राबवला जात असल्याचे स्पष्ट होत आहे. महापालिकेतील विविध विभागांतील माहितीचे संकलन करणे आणि त्याआधारे महापालिकेची सकारात्मक प्रसिद्धी करण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाकडून नवा फंडा राबवण्यात येत आहे. सिटी हब फॉर डाटा ॲण्ड कम्युनिकेशन या गोंडस नावाखाली दरवर्षी तब्बल 21 कोटी रुपयांची उधळपट्टी केली जात आहे. त्या माध्यमातून माहितीचे संकलन करण्यासाठी प्रत्येक विभागात अधिकाऱ्यांच्या दिमतीला खासगी एजन्सीचे कर्मचारी नेमण्यात आले आहेत.

महापालिकेतील विविध योजना, कार्यक्रम तसेच, प्रकल्पांची माहिती प्रसिद्धी माध्यमांपर्यंत पोहोचवण्यासाठी महापालिकेचा माहिती व जनसंपर्क विभाग कार्यरत आहे. या विभागाचे प्रमुख उपायुक्त आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली विशेष अधिकारी, जनता संपर्क अधिकारी यांच्यासह मुख्य लिपिक, लिपिक व कंत्राटी कर्मचारी असे 25 हून अधिक कर्मचारी काम



करत आहेत. अनेक कंत्राटी कर्मचारीही नेमले असून, जनसंपर्क विभागाचे काम करीत आहेत.

विभागानुसार माहिती संकलित करून प्रसारमाध्यमांना देण्याची जबाबदारी त्या विभागाची आहे मात्र, खासगी एजन्सीचे खिसे भरण्यासाठी सिटी हब या नावाखाली तसेच, तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या आग्रहाखातर त्या विभागाने नवीन उपक्रम राबवला आहे. मार्च 2024 ला काढलेल्या या निविदेसाठी मर्जीतील एकच एजन्सी पात्र ठरली. औंध, पुणे येथील फॉक्सबेरी टेक्नॉलॉजीस प्रा. लि. या एजन्सीचा 20 कोटी 12 लाख 89 हजार 684 रुपयांचा दर स्वीकृत करण्यात आला. त्यास स्थायी समितीने म्हणजे प्रशासक शेखर सिंह यांनी 10 सप्टेंबर 2024 ला मान्यता दिली. चौदा ऑक्टोबर 2024 ला वर्कऑर्डरही देण्यात आली.

महापालिकेच्या विविध विभागांची निर्णय क्षमता वाढविणे, विविध विभागांमार्फत देण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवा व त्यातून प्राप्त होणाऱ्या माहितींचे एकत्रीकरण करून त्याद्दष्टीने आवश्यक कार्यप्रणाली तयार करणे हे आहे. महापालिकेच्या उत्पन्न वाढीसोबतच नागरिकांच्या विविध तक्रारींचे निराकरण योग्य पद्धतीने करणे, प्राप्त माहितीचे विश्लेषण करून त्यातून विविध धोरणे आखणे, संवाद माध्यमे कार्यान्वित करणे, विविध निर्णयांची अंमलबजावणी करणे, असा या प्रकल्पाचा उद्देश आहे. मात्र, तो हेतू सफल झालेला दिसत नाही.



कचरा व्यवस्थापनावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे

■ चाकण (दै. संध्या)

चाकण शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या उद्देशाने चाकण नगरपरिषदेच्या वतीने विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. शहरातील कचरा व्यवस्थापनावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी एकूण ५२ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे.

कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाकडून विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. चाकण शहराने स्वच्छतेच्या बाबतीत महाराष्ट्रात अव्वल क्रमांक मिळवावा, या उद्देशाने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, नगरसेविका सुवर्णा राक्षे, नगरसेवक मंगेश कांडगे, नगरसेविका ॲड. वर्षा शेवकरी अन्य नगरसेवक, नगरसेविका, नगरपरिषदेचे अधिकारी, प्रशासन व कर्मचारी आदी नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत प्रचंड जनजागृती करीत आहेत. शहरातील काही भागांमध्ये नागरिकांकडून घंटागाडीत कचरा न टाकता रस्त्याच्या कडेला, सार्वजनिक ठिकाणी तसेच मोकळ्या जागेत टाकला जात असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे शहराच्या सौंदर्यावर विपरीत परिणाम होत आहे. नागरिकांनी कचरा घंटागाडीतच टाकावा, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा मनीषा गोरे व गटनेते नितीन गोरे यांनी केले आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या व्यक्तीवर एक हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे. कचरा टाकणाऱ्या व्यक्तीची माहिती नगरपरिषदेला देऊन त्याला पकडून देणाऱ्या नागरिकास पाचशे रुपये बक्षीस देण्याची तरतूद करण्यात आली आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून कचरा टाकणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यात येणार आहे.

> स्वच्छ चाकण, सुंदर चाकण या अभियानाला नागरिकांचे सहकार्य अपेक्षित आहे. घरातील कचरा घंटागाडीतच टाकावा. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे चुकीचे आहे. महाराष्ट्रात चाकण शहर स्वच्छतेत अव्वल ठरविण्यासाठी प्रशासनासोबत नागरिकांनीही स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे.
> - सुवर्णाताई राक्षे, प्रथम महिला उपनगराध्यक्षा, चाकण.

अवैद्य दारुची विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगारास दोन वर्षाकरीता तडीपार

■ लोणी काळभोर (दै. संध्या)



देशी-विदेशी दारुची अवैद्य विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगारास दोन वर्षाकरिता लोणीकाळभोर पोलीसांनी तडीपार केले असल्याची माहिती लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप पवार यांनी दिली.

पुणे शहर पोलीस आयुक्त, अमितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिसरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, त्याचप्रमाणे पुणे शहरातील जनतेचे रक्षण व्हावे तसेच कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये याकरीता पुणे शहरातील गुन्हेगार टोळी, पोलीस अभिलेखावरील टोळीतील गुंड, शरीर व मालमत्ते विरुध्द गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत करणारे सराईत गुन्हेगारांच्या हालचालीवर नजर ठेवुन त्यांच्या विरुध्द ठोस व परिणामकारक कारवाई करणे. तसेच अवैद्य धंद्यांचे समूळ उच्चाटन करुन अवैद्य व्यवसाय करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार यांच्यावर कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

त्याप्रमाणे लोणीकाळभोर परिसरात देशी-विदेशी दारूची अवैध विक्री करून अवैध व्यवसाय करणारा सराईत आरोपी अक्षय वामन जाधव, वय २५ वर्षे, रा. नांदे पाटील वस्ती, सिद्राम मळा, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे याच्याविरुद्ध तडीपारची कारवाई करण्यात आली आहे.

सदर आरोपीविरुद्ध यापूर्वी देशी-विदेशी दारूची विक्री तसेच इतर अवैध कृत्यांबाबत एकूण ७ गुन्हे दाखल आहेत. वारंवार कारवाई करूनही त्याच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने तसेच त्याच्या अवैध कृत्यांमुळे परिसरातील लोक दारुच्या व्यसनाच्या आहारी जावून दारुमुळे कुटुंब उध्दवस्त होत असल्याने व त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने त्यास दोन वर्षाच्या कालावधीसाठी पुणे पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय व पुणे जिल्हयाचे कार्यक्षेत्रातुन तडीपार करण्यात आलेले आहे. जर कोणीही इसम देशी-विदेशी दारूची अवैध विक्री, साठवणूक व वाहतूक करत असेल अशा अवैध व्यवसायांना प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध यापुढेही कठोर प्रतिबंधात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

ही कार्यवाही अमितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर, संजय दराडे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर,मनोज पाटील, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशीक विभाग, पुणे शहर, जीवन बेनिवाल, पोलीस उपआयुक्त परि, ०६, पुणे शहर, श्रीमती अनुराधा उदमले, सहा. पोलीस आयुक्त, लोणी काळभोर विभाग, पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदिप पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) नंदकुमार कोळी, सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिश गोडसे, पोलीस अंमलदार विलास शिंदे, प्रशांत नरसाळे, स्वाती पिसाळ, वैजीनाथ शेलार, अमोल जाधव, गणेश शिंदे, आणा माने, सागर जगदाळे, निलेश कोल्हे, सुरज कुंभार, प्रविण दडस, राहुल कर्डीले, सचिन सोनवणे, सागर धायतोंडे, अशोक गिरी, अशोक खरात यांनी केली.

थोडक्यात पण महत्वाचे

वडगाव काशिंबेग-नारोडी रस्ता झाडाझुडपांपासून मोकळा



मंचर : दैनिक संध्या

आंबेगाव तालुक्यातील श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग ते चिंचोडी देशपांडे मार्गे नारोडी या रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली झाडेझुडपे व गवत भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या सहकार्याने जेसीबीच्या साहाय्याने काढण्यात आले.त्यामुळे रस्ता वाहतुकीसाठी मोकळा व सुरक्षित झाला असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. मंचर येथून वडगाव काशिंबेग,चिंचोडी देशपांडे ते नारोडी अशी एसटी बससेवा सुरू आहे.तसेच शेतीमाल बाजारपेठेत नेण्यासाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे. मात्र,रस्त्याच्या दुतर्फा झाडेझुडपे व मोठ्या प्रमाणात गवत वाढल्याने तसेच झाडांच्या फांद्या रस्त्यावर आल्याने वाहनांच्या वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी करण्यात आली होती.दरम्यान, माजी गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील चिंचोडी देशपांडे येथे आले असता ग्रामस्थांनी ही समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी भीमाशंकर सहकारी साखर कारखाना प्रशासनाशी संपर्क साधून रस्ता मोकळा करण्याची सूचना केली.म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांनीही यासाठी पुढाकार घेतला. कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे-पाटील यांनी तातडीने जेसीबी उपलब्ध करून दिला.दोन दिवसांत झाडेझुडपे, गवत व इतर अडथळे दूर करण्यात आले.त्यामुळे एसटी बससह इतर वाहतूक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.अशी माहिती आंबेगाव तालुका खरेदी विक्री संघांचे अध्यक्ष नवनाथ हुले आणि लांडेवाडीचे माजी उपसरपंच राजेंद्र शेवाळे यांनी दिली.रस्ता मोकळा झाल्यामुळे बिबट्यांचे किंवा इतर हिंस्त्र प्राण्याचे फारसे भय राहिले नाही.असे नारोडीच्या सरपंच मंगलताई हुले यांनी सांगितले.

घरगुती गॅस सिलिंडरचे मुंढव्यात बेकायदा रिफिलिंग

घरगुती गॅस सिलिंडरमधून बेकायदा पद्धतीने गॅस काढून तो रिकाम्या सिलिंडरमध्ये भरून विनापरवाना विक्री करण्याचा प्रकार मुंढवा गावात उघडकीस आला आहे. या प्रकारात गॅसगळती होऊन आग किंवा स्फोट होण्याचा धोका असल्याने मुंढवा पोलिसांनी भूपेंद्रप्रताप सुंदर सिंह (३८), मानकराम सुखराम सियाक (३९) आणि महेंद्र बाबूराम खिचड (१९) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, भरलेल्या घरगुती सिलिंडरमधून पाइपच्या साहाय्याने गॅस काढून तो रिकाम्या सिलिंडरमध्ये भरला जात होता. यासाठी संबंधित विभागाची परवानगी घेण्यात आलेली नव्हती. तसेच, गॅस हाताळताना आवश्यक सुरक्षा उपाययोजनाही करण्यात आल्या नव्हत्या. ७ ऑक्टोबरला सकाळी ९:३०च्या सुमारास पोलिसांना याबाबत माहिती मिळाली. त्यानंतर केलेल्या तपासणीत विनापरवाना गॅस काढून दुसऱ्या सिलिंडरमध्ये भरला जात असल्याचे आढळून आले. गॅसगळतीमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण झाला होता. पोलीस कर्मचारी एकता बाबूराव साळुंके यांच्या तक्रारीवरून मुंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक स्मिता वासनिक तपास करीत आहेत. शहरातील अशा पद्धतीने बेकायदा गॅस रिफिलिंगच्या प्रकारांवर पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे. विनापरवाना गॅस सिलिंडर रिफिलिंग होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस उपायुक्त जीवन बेनिवाल यांनी केले आहे. शहरातील सर्व गॅस डीलर्सची बैठक घेऊन त्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.





विद्यार्थ्यांनी कौशल्य ओळखून करिअरची निवड करावी - ॲड. महेश लोहारे

■ चाकण (दै. संध्या)

करिअरच्या वाटा शोधताना आत्मविश्वासाने पाऊल टाकणे अपेक्षित असून, विद्यार्थ्यांनी कौशल्य ओळखून करिअरची निवड करावी असे विचार ॲड. महेश लोहारे यांनी व्यक्त केले. येथील ज्ञानवर्धिनी विद्यालयात करिअरच्या वाटा आणि सायबर सुरक्षितता या विषयावर मार्गदर्शन करताना लोहारे बोलत होते. स्व. गुलाबराव गोरे प्रतिष्ठान शिक्षण संस्था संचलित ज्ञानवर्धिनी विद्यालय,

भामा इंग्लिश मीडियम स्कूल आणि स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, चाकण यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम सुरू आहे. संस्थेचे संस्थापक स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि संस्थेच्या रौप्य महोत्सव वर्ष २०२६ चे औचित्य साधून या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

ॲड. लोहारे पुढे म्हणाले, " करिअरच्या वाटा शोधताना आत्मविश्वासाने पाऊल टाकले पाहिजे. विद्यार्थ्यांना सध्याच्या काळातील विविध क्षेत्रांमधील घटनांची माहिती मिळणे अपेक्षित आहे. केवळ पारंपरिक वाटांवर न जाता स्वतःची आवड आणि कौशल्य ओळखून करिअरची निवड करावी. अपयशाने खचून न जाता सातत्यपूर्ण प्रयत्न आणि योग्य नियोजनाच्या जोरावर यश नक्कीच संपादन करता येते. सायबर गुन्हेगारी आणि सुरक्षिततेबाबत सर्वांनी अलर्ट राहिले पाहिजे."

वाढत्या तंत्रज्ञानाच्या वापराबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र पवार, राहुल आरोटे, सायली सरवदे आदींनी यावेळी सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी, ऑनलाईन फसवणूक किंवा सायबर अडचणीला कसे सामोरे जावे आणि पोलीस प्रशासन यामध्ये कशी मदत करते, याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चाकण ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिष्ठाता सचिन कांबळे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. मानव विकास कल्याण ट्रस्टचे अध्यक्ष दत्तात्रय गोरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी नगराध्यक्षा मनिषा गोरे, महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, कलाविष्कार मंचचे संचालक विजय तांबे, उद्योजक मनोहर शेवकरी, प्राचार्या प्रमिला गोरे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, सचिन आभाळे आदी उपस्थित होते.

प्राचार्या प्रमिला गोरे यांनी प्रास्ताविक केले. सुनील वडेकर यांनी सूत्रसंचालन केले. गणेश काळे यांनी स्वागत केले. लीना नारखेडे यांनी आभार मानले.

इंदापूरच्या उपअभियंता पदासाठी जोरदार 'फिल्डिंग'...!

■ इंदापूर (दै. संध्या)

इंदापूर पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचे उपअभियंता शिवाजी राऊत यांची शिरूर-दौंड येथे बदली झाल्यानंतर हे पद गेल्या काही दिवसांपासून रिक्त आहे. मात्र, या रिक्त पदावर वर्णी लागण्यासाठी अनेक उपअभियंत्यांकडून जोरदार 'फिल्डिंग' सुरू असल्याची चर्चा आहे. जिल्हा परिषदेपासून मंत्रालयापर्यंत काहींनी प्रयत्न सुरू केले असून, यापूर्वी इंदापूरमध्ये काम केलेल्या अधिकाऱ्यांकडूनही पुन्हा येथे नियुक्ती मिळविण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, प्रशासकीय पातळीवर अद्याप या पदाचा पदभार कोणाकडेही सोपविण्यात आलेला नाही. त्यामुळे इंदापूरच्या उपअभियंता पदावर कोणाची वर्णी लागणार, याकडे बांधकाम विभागासह राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

इंदापूर पंचायत समितीच्या बांधकाम विभागातील कामकाजाबाबत गेल्या एक दीड वर्षात जिल्हा परिषद तसेच विभागीय आयुक्त कार्यालयाकडे मोठ्या प्रमाणात तक्रार अर्ज दाखल झाल्याची माहिती आहे. मात्र, या तक्रारींवर अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे सांगण्यात येते. विशेष म्हणजे, यापूर्वी एकाच उपअभियंत्याकडे तीन तालुक्यांचा अतिरिक्त पदभार देण्यात आला होता. तीन तालुक्यांचा कारभार सांभाळताना कामांना पुरेसा वेळ देता न आल्याने काही ठिकाणी कामांची गुणवत्ता आणि कार्यक्षमतेबाबत प्रश्न उपस्थित झाले. झालेल्या काही कामांमध्ये अनियमितता व गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी नागरिकांनी लेखी स्वरूपात केल्या आहेत. एका प्रकरणात कामातील दिरंगाईबाबत विभागीय आयुक्त कार्यालयाने संबंधित उपअभियंत्यावर कारवाई करण्याचे आदेश जिल्हा परिषदेला दिल्याची माहिती आहे. तीन तालुक्यांचा पदभार सांभाळताना कामाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनीही केली होती.

उपअभियंता पद रिक्त होताच अनेक इच्छुक अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेसह आमदार आणि मंत्र्यांकडे संपर्क सुरू केल्याची चर्चा आहे. त्यामुळे इंदापूरच्या या एका पदासाठी एवढी 'फिल्डिंग' का? असा सवाल प्रशासकीय वर्तुळात चर्चिला जात आहे.

पूर्वी बारामती आणि इंदापूर या दोन्ही तालुक्यांचा बांधकाम विभागाचा कारभार बारामतीतील उपअभियंत्याकडे सोपविला जात होता. त्यानंतर इंदापूरसाठी स्वतंत्र उपअभियंता पद निर्माण करून अधिकारी देण्यात आला. आता हे पद पुन्हा रिक्त झाल्याने त्याचा अतिरिक्त पदभार कोणाकडे सोपविला जातो किंवा स्वतंत्र उपअभियंत्याची नियुक्ती केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मलठणमध्ये स्टोन क्रशरच्या ब्लास्टिंग, धुळीमुळे शेती-फळबागांचे नुकसान?; कारवाईची मागणी

संरक्षण कुंपण कोसळले, जमिनीला भेगा; दोन वर्षांपासून तक्रारी प्रलंबित असल्याचा शेतकऱ्याचा दावा

■ टाकळी हाजी (दै. संध्या)

मलठण (ता. शिरूर) परिसरातील दगडखाणी व स्टोन क्रशरमधील ब्लास्टिंग आणि धुळीमुळे शेती, फळबागा तसेच जमीन व संरक्षण कुंपणांचे नुकसान होत असल्याची तक्रार पुढे आली आहे. याप्रकरणी विलास थानमल पालरेशा यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासह जिल्हाधिकारी, तहसीलदार व पोलिस प्रशासनाकडे लेखी तक्रार करून संबंधितांवर कारवाईसह नुकसानभरपाईची मागणी केली आहे.

पालरेशा यांच्या म्हणण्यानुसार, मलठण परिसरातील त्यांच्या जमिनीलगत असलेल्या भाऊसाहेब पाचंगे यांच्या भाग्यलक्ष्मी स्टोन क्रशरमधील ब्लास्टिंगमुळे संरक्षण कुंपण कोसळले असून, जमिनीला भेगा पडल्या आहेत. क्रशरमधून उडणाऱ्या धुळीमुळे आंबा, पेरू, चिकू, जांभूळ यांसह हजारो फळझाडांचे नुकसान झाले असून, अनेक झाडे खराब झाल्याचा दावा त्यांनी तक्रारीत केला आहे.



ब्लास्टिंग करताना आवश्यक सुरक्षित अंतर राखले जात नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तसेच उत्खनन व खनिज वाहतुकीदरम्यान धूळ नियंत्रणासाठी पुरेशा उपाययोजना होत नसल्याने परिसरात धुळीचे लोट पसरत असल्याचे पालरेशा यांनी नमूद केले आहे.

खाणपट्टे व स्टोन क्रशरला परवानगी देताना वृक्षलागवड, धूळ नियंत्रण आणि सुरक्षिततेसंदर्भात विविध अटी घालण्यात येतात. संबंधित ठिकाणी या अटींचे पालन होते की नाही, याची प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी मागणी केली आहे.

या प्रश्नाबाबत गेल्या दोन वर्षांपासून जिल्हाधिकारी, तहसीलदार, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पोलिस प्रशासनाकडे तक्रारी केल्याचे पालरेशा यांनी सांगितले. मात्र, अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा त्यांचा दावा आहे. त्यामुळे प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचे मूल्यांकन करावे आणि नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी केली. तक्रारीतील आरोपांची प्रत्यक्ष पाहणी व चौकशी झाल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. याबाबत शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.


वाघोलीमधील वाहतूक कोंडी दूर करा; संपत गाडे

■ वाघोली (दै. संध्या)

पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी वाहतूक नोंदीसाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल कौतुक करत वाघोली मधील ग्रामस्थांनी वाघोलीतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तातडीने योग्य त्या उपाययोजना करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली असल्याची माहिती वाहतूक नियंत्रण समितीचे प्रमुख संपत गाडे यांनी दिली. पोलीस आयुक्तांना वाघोली मधील वाहतूक कोटी दूर करण्यासाठी वाहतूक नियंत्रण समितीच्या संयोजकांनी वाघेश्वर, आव्हाळवाडी व केसंनद चौकात रहदारीच्या वेळेस अधिक पोलिस बंदोबस्त ठेवावा. उलट मार्गाने येणाऱ्या वाहनावर तातडीने दंडात्मक कारवाई करावी. रहदारी प्रतिबंधक पथक स्थापन करावे व त्यात स्थानिक नागरिकांचाही समावेश करावा. वाघेश्वर मंदिर ते बीजेएस कॉलेज दरम्यान रस्त्याच्या कडेला पार्किंग करण्यास मनाई करावी, व अशा वाहनांवरही दंडात्मक कारवाई करावी.

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक





दुष्काळाचे सावट : संवेदनशील शासनाचा भक्कम आधार

'एल निनो'चा अत्युच्च प्रभाव, हिंदी महासागरातील द्विध्रुव स्थिती आणि पावसासाठी आवश्यक कमी दाबाच्या क्षेत्राच्या अभावामुळे महाराष्ट्रावर दुष्काळाचे संकट निर्माण झाले आहे. बराचसा भाग हवामानातील टोकाचे चढ-उतार आणि निसर्गाची अवकृपा अनुभवत आहे. राज्याच्या ग्रामीण अर्थकारणाला चालना देणाऱ्या खरीप हंगामापुढे पर्जन्यमानातील मोठ्या तुटीने दुष्काळाचे आव्हान निर्माण केले आहे. शेतातील उभी पिके एक तर करपली आहेत किंवा ती पार वाळून गेल्याचे चित्र अनेक भागांत निर्माण झाले आहे. कुठे पिकांच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पुरेसे जलसाठे निर्माण न झाल्याने पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्नही काही भागात आ वसून उभा आहे. दुष्काळाचे संकेत मिळत असतानाच स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्यासह काही दुष्काळी भागांना भेट दिली. प्रत्यक्ष बांधावर जाऊन त्यांनी दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. या संकटाच्या काळात राज्य शासन प्रत्येक शेतकऱ्याच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा विश्वास त्यांनी दिला.



परिस्थितीवर अत्यंत गांभीर्याने लक्ष ठेवून असलेल्या राज्य शासनाने कुठल्याही आकडेमोडीच्या तांत्रिकतेत न अडकता आपली संवेदनशील निर्णयक्षमता दाखवत तडकाफडकी दिलासा देणारे निर्णय जाहीर केले. या निर्णयांची अंमलबजावणीही सुरु झाली आहे. संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा कामाला लागल्याचे चित्र सर्वदूर दिसत आहे.

दुष्काळ व्यवस्थापन संहितेनुसार २६५ तालुक्यांमध्ये 'प्रथम कळ' (Trigger-१) अंतर्गत अधिकृतपणे दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. आपत्तीच्या क्षणी सामान्य नागरिकाला भक्कम प्रशासकीय आधार मिळणे ही केवळ औपचारिकता नसून शासनाचे प्राथमिक कर्तव्य आहे, याच जाणिवेतून हा निर्णय घेण्यात आला.

केवळ दुष्काळ जाहीर करून राज्य शासन थांबलेले नाही. सोबतच दुष्काळाने प्रभावित होणाऱ्या संभाव्य घटकांना दिलासा देणारा १२ कलमी आराखडाही राज्य शासनाने जाहीर केला आहे. दुष्काळात शेतकरी हा सर्वात प्रभावित होणारा घटक ठरतो. संभाव्य आर्थिक विवंचनेत सापडणाऱ्या शेतकऱ्यांना तातडीने काय दिलासा देता येईल, याचा गांभीर्याने विचार करून राज्य शासनाने निर्णय घेतले असून त्या निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी सुरूही झाली आहे. एकीकडे पिकांच्या नुकसानीचे अंतिम स्वरूप स्पष्ट झाल्यानंतर स्वतंत्र निर्णयाद्वारे नुकसानभरपाईची आर्थिक मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असतानाच, दुसरीकडे तातडीचे धोरणात्मक निर्णय लागूही करण्यात आले आहेत.

बाधित तालुक्यांतील शेतकऱ्यांचा संपूर्ण जमीन महसूल माफ करण्यात आला. तसेच पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याचे निर्देश देत शेतीशी निगडित सर्व प्रकारच्या कर्जवसुलीस स्थगिती देण्यात आली. साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचे वीजबिल आधीच माफ करण्यात आले असताना, आता त्यावरील क्षमतेच्या पंपांनाही चालू वीजबिलात विशेष सूट देण्यात आली आहे. शिवाय, वीज बिल थकबाकीमुळे कोणतीही शेती वीजजोडणी खंडित न करण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आगामी काळाची चिंता भेडसावणार नाही, याची पूर्ण काळजी राज्य शासनाकडून घेण्यात आली आहे.

विविध कारणांमुळे आर्थिक अडचणीत येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने काही महिन्यांपूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची यशस्वीपणे अंमलबजावणी केली होती. त्याद्वारे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला. आता दुष्काळाचे संकट उभे ठाकले असताना त्याच निर्धाराने शेतकऱ्यांना मदतीचा आधार देण्याची तयारी सुरू आहे.

दुष्काळामुळे केवळ शेती आणि पिकांचेच नुकसान होत नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेतील इतरही घटक अडचणीत येतात. या अडचणींचे स्वरूपही वेगवेगळे असते. ही बाब लक्षात घेऊन राज्य शासनाने आपल्या निर्णयांद्वारे सामाजिक सुरक्षिततेवरही भर दिला आहे. दुष्काळाची झळ विद्यार्थ्यांच्या भवितव्याला बसू नये, याची काळजी राज्य शासनाने घेतली आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. दुष्काळाच्या काळात ग्रामीण भागात रोजगाराच्या शोधात मोठ्या प्रमाणात स्थलांतराची परिस्थिती निर्माण होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून राज्य शासनाने ग्रामीण भागातील स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेच्या निकषांमध्ये शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करण्याचे पाऊल उचलले आहे. कुटुंबांना अन्नधान्याची टंचाई जाणवू नये, यासाठी पुरवठा यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.

टंचाई जाहीर झालेल्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने व्यवस्था उभ्या करण्यात आल्या आहेत. आवश्यक तिथे पाण्याचे टँकर्स उपलब्ध करण्यात येत आहेत. जनावरांच्या चाऱ्याची टंचाई भासू नये, यासाठी चारा डेपो व छावण्यांचे पूर्वतयारी नियोजन आणि जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर हाती घेण्यात आली आहेत.

पिण्याच्या पाण्याचे संकट काही प्रमाणात शहरी भागातही निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलस्रोतांचा काटेकोर वापर, वापराचे प्राधान्यक्रम तसेच मर्यादित पाणी कपातीसारखे निर्णयही स्थानिक पातळीवर घेण्यात येत आहेत. भविष्यात पिण्याच्या पाण्याचे गंभीर संकट निर्माण होऊ नये, यासाठी ही खबरदारी घेतली जात आहे. हे संकट अधिक गडद होऊ नये, यासाठी पाण्याचा मर्यादित व काटेकोर वापर करण्याबाबत जनजागृतीही करण्यात येत आहे.

आपत्ती निवारण ही केवळ एक तांत्रिक प्रक्रिया नसून त्यामागे मानवी दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकी असणे अत्यावश्यक असते. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने घेतलेले हे गतिमान निर्णय ग्रामीण जनतेला केवळ आर्थिक दिलासा देणारे नसून, या कठीण काळात शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा ठाम विश्वास निर्माण करणारे आहेत. या विश्वासाच्या बळावर संकटावर मात करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने देखील आपला खारीचा वाटा उचलण्याची गरज आहे.

– संचालक (माहिती) कार्यालय, नागपूर

थोडक्यात पण महत्वाचे

परिसंस्थेसाठी एकात्मिक विकास महत्वाचा – मंत्री नितेश राणे

मुंबई : बंदर विकासाला कनेक्टिव्हिटी, लॉजिस्टिक्स, जहाजबांधणी, मत्स्यव्यवसाय आणि किनारी पर्यटनाची जोड देऊन महाराष्ट्राची सागरी परिसंस्था अधिक सक्षम करण्यासाठी आंध्र प्रदेशच्या एकात्मिक विकास मॉडेलमधील उपयुक्त बाबींचा अभ्यास करण्यावर मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी भर दिला. आंध्र प्रदेशच्या सागरी आणि बंदर-केंद्रित विकास परिसंस्थेच्या अभ्यास दौऱ्यादरम्यान मंत्री राणे यांनी आंध्र प्रदेशचे बंदरे मंत्री बी. सी. जनार्दन रेड्डी यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. आंध्र प्रदेशातील ग्रीनफिल्ड बंदरांचा विकास, जहाजबांधणी व जहाज दुरुस्ती क्लस्टर्स, आधुनिक मत्स्यबंदरे, अंतर्देशीय जलमार्ग, वॉटर मेट्रो, किनारी पर्यटन, बंदरांची कनेक्टिव्हिटी आणि लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधांबाबत बैठकीत सादरीकरण झाले. बंदरांच्या माध्यमातून औद्योगिकीकरणाला चालना देणाऱ्या उपक्रमांची माहितीही मंत्री राणे यांनी घेतली.

जपानी उद्योगांच्या विस्तारासाठी सहकार्य : मंत्री संजय सावकारे

मुंबई : भारत-जपान संबंधांना आर्थिक सहकार्याची नवी व्यापक दिशा देण्याची ही योग्य वेळ असून, जपानी उद्योगांच्या विस्तारासाठी महाराष्ट्र सर्वतोपरी सहकार्य करेल. जपानी कंपन्यांनी महाराष्ट्राकडे केवळ गुंतवणुकीचे केंद्र म्हणून न पाहता, भारतासह जागतिक बाजारपेठेतील विस्तारासाठी धोरणात्मक भागीदार आणि सक्षम लॉजिस्टिक्स हब म्हणून पाहावे, असे आवाहन वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी केले. हॉटेल ताज लँड्स एन्ड, वांद्रे येथे निक्केई एशिया आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'निक्केई इंडिया-जपान इकॉनॉमी अँड इन्व्हेस्टमेंट फोरम' आयोजित करण्यात आले होते. यावेळी भारतातील जपानचे राजदूत केइची ओनो, निप्पॉन लाइफ इंडिया ॲसेट मॅनेजमेंट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप सिक्का, जपान बँक फॉर इंटरनॅशनल कोऑपरेशनच्या इक्विटी फायनान्स समूहाच्या जागतिक प्रमुख व वरिष्ठ कार्यकारी व्यवस्थापकीय अधिकारी काझुको साकुमा, टोयो इंजिनिअरिंग इंडिया प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक ताकाशी कावाहारा यांच्यासह जपान व भारतातील उद्योग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे म्हणाले की, भारत आणि जपानमधील संबंध हे परस्पर विश्वास, एकमेकांचा आदर आणि समान मूल्यांवर आधारलेले आहेत. उत्पादन, तंत्रज्ञान, नवोन्मेष, पुरवठा साखळी आणि शाश्वत विकास या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांना एकत्र काम करण्याची मोठी संधी आहे.

अवैध गर्भलिंग निदानाविरुद्ध यंत्रणा सक्रिय करा : गोऱ्हे

■ बीड (दै. संध्या)

दुष्काळ आणि हंगामी स्थलांतराच्या पार्श्वभूमीवर ऊसतोड कामगार महिला, पुरुष व बालकांच्या आरोग्यसेवेत खंड पडू देऊ नये. अनावश्यक गर्भाशय शस्त्रक्रियांना प्रतिबंध करण्यासोबतच अवैध गर्भलिंग निदानाविरुद्ध आरोग्य विभाग आणि पोलिसांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या. सोनोग्राफी केंद्रे असलेल्या महत्त्वाच्या सार्वजनिक रस्त्यांवर CCTV बसवण्याच्या दृष्टीने आवश्यक ठिकाणांचे प्रस्ताव सादर करावेत, अशी सूचनाही त्यांनी केली.

बीड येथील जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात आयोजित बैठकीत ऊसतोड कामगारांचे आरोग्य, गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रिया तसेच PCPNDT व MTP कायद्यांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. विधान परिषद सदस्या तथा माजी उपसभापती आणि या दोन्ही कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय कृती दलाच्या अध्यक्ष डॉ. गोऱ्हे यांनी अधिकाऱ्यांकडून प्रगती, अडचणी व पुढील नियोजनाची माहिती घेतली.

प्रत्यक्ष ऊसतोडीसाठी टोळ्यांसोबत जाणाऱ्या महिलांची आरोग्यसाथी म्हणून निवड झाल्याची खात्री करावी. सामाजिक संस्थांनी दिलेली माहिती



आणि प्रशासनाकडील यादी यांची पडताळणी करण्यासाठी दोन ते तीन दिवसांत बैठक घ्यावी, अशी सूचना डॉ. गोऱ्हे यांनी केली. स्थलांतर न करणाऱ्या महिलांना गावपातळीवर आरोग्यसाथी म्हणून सहभागी करून घेता येईल; मात्र स्थलांतरित टोळीसोबत प्रशिक्षित आरोग्यसाथी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आरोग्यसाथींना ओळखपत्र, पुरेसे प्रशिक्षण आणि प्रथमोपचार साहित्य उपलब्ध असावे, अशी सूचना करण्यात आली. औषधे संपल्यानंतर त्यांचा नियमित पुरवठा व्हावा. संबंधित आरोग्य केंद्रांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करून औषधांच्या उपलब्धतेची माहिती व्हॉट्सॲपद्वारे कळवावी, असेही त्यांनी सांगितले.

आरोग्य कार्डामध्ये महिला, पुरुष व बालकांच्या गरजांनुसार तपासण्यांची नोंद असावी. रक्तक्षय, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार तसेच डोळे, कान व दातांच्या तपासण्यांचा समावेश करावा. स्थलांतराचे मार्ग आणि मुक्कामाची ठिकाणे जाणून घेऊन फिरती आरोग्यसेवा व स्थानिक आरोग्य केंद्रांशी संपर्काची व्यवस्था करावी. बालकांचे लसीकरण, पोषण आहार आणि अंगणवाडी सेवांसाठी महिला व बालविकास विभागाशी समन्वय साधावा, असे त्यांनी नमूद केले. खाजगी रुग्णालयांतील गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांची वैद्यकीय आवश्यकता आणि संबंधित नोंदी तपासाव्यात. अनावश्यक शस्त्रक्रिया आढळल्यास प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या शिफारशी कराव्यात. बीडमधील महिलांच्या लगतच्या जिल्ह्यांत झालेल्या शस्त्रक्रियांची माहिती मिळवण्याचा विषय राज्यस्तरीय बैठकीत चर्चेसाठी मांडण्यात येईल, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या महिलांचा नियमित आरोग्य पाठपुरावा करावा. त्यांना आवश्यकतेनुसार रजोनिवृत्ती अर्थात मेनोपॉज क्लिनिकशी जोडून शारीरिक व मानसिक आरोग्यविषयक समुपदेशन, पोषणविषयक मार्गदर्शन आणि आवश्यक उपचार उपलब्ध व्हावेत. महिलांचे स्वमदत गट तयार करून त्यांचे मनोबल वाढवावे. गर्भाशयाच्या आजारांविषयी आणि कर्करोगाच्या भीतीविषयी योग्य माहिती देऊन अनावश्यक शस्त्रक्रिया टाळण्यासाठी जनजागृती करावी, अशी सूचना त्यांनी केली. मनीषा टोकले व ॲड. संगीता चव्हाण यांनी चर्चेत दुष्काळामुळे वाढलेले स्थलांतर, आरोग्यसेवेपासून वंचित राहणारे कामगार, आरोग्यसाथींच्या निवडीतील त्रुटी आणि औषधपुरवठ्यातील अडचणी मांडल्या. गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या महिलांच्या समुपदेशन व नियमित आरोग्य पाठपुराव्याची गरजही अधोरेखित करण्यात आली. अवैध गर्भलिंग निदान रोखण्यासाठी जिल्हास्तरीय कृती दलाची रचना व सदस्यांचे नामनिर्देशन शासन निर्देशांनुसार तपासून नियमित बैठका घ्याव्यात. सामाजिक क्षेत्रातील सक्रिय महिलांचा सहभाग वाढवून माहिती संकलन, जनजागृती आणि कार्यवाहीचा पाठपुरावा मजबूत करावा, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. सोनोग्राफी केंद्रांची नोंदणी प्रमाणपत्रे, 'फॉर्म एफ' आणि संबंधित अभिलेखांची नियमानुसार तपासणी करावी. पशुवैद्यकीय सोनोग्राफी यंत्रांचा मानवी गर्भलिंग निदानासाठी गैरवापर होत असल्याच्या तक्रारींची पुराव्यांसह चौकशी करावी. ऑनलाइन विक्री व जाहिरातींबाबतच्या तक्रारीही पडताळून संबंधित यंत्रणांकडे पाठवाव्यात, अशी सूचना त्यांनी केली. अनधिकृत व्यक्तींकडून होणारे गर्भपात व इतर गैरप्रकार रोखण्यासाठी तपासणी मोहीम राबवावी. PCPNDT व MTP प्रकरणांतील तपास आणि कार्यवाहीसाठी आरोग्य विभाग व पोलिसांनी संयुक्त कार्यपद्धती निश्चित करावी. नियमांचे पालन करणाऱ्या डॉक्टरांनी तपासणीला सहकार्य करावे; तपासणीच्या नावाखाली धमकावणे किंवा गैरप्रकार होऊ नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले. सोनोग्राफी केंद्रे असलेल्या बीड शहर व तालुक्यांतील महत्त्वाच्या सार्वजनिक रस्त्यांवर CCTV बसवण्यासाठी आवश्यक ठिकाणांची यादी व प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना डॉ. गोऱ्हे यांनी आरोग्य विभागाला दिल्या. संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यास आणि अवैध गर्भलिंग निदानाला प्रतिबंध करण्याच्या प्रयत्नांना यामुळे मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

केंद्रीय पथकाकडून देमनी शिवारात दुष्काळी परिस्थितीची पाहणी

■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय पथकाने आज देमनी शिवारात पाहणी केली.

देमनी येथील शेतकरी विलास देविदास शिंदे यांच्या गट ८४ मधील १ हे २० आर क्षेत्रात सोयाबीन पिकाची लागवड होती. पावसाअभावी पूर्ण पीक करपून गेले आहे. यावेळी पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधून सर्व स्थिती जाणून घेतली.

कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे



उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया यांचा समावेश आहे. या पाहणीवेळी राज्याचे कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. हे तसेच स्थानिक प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय पथकाला विभागीय आयुक्तांकडून दुष्काळी परिस्थितीचे सविस्तर सादरीकरण

■ छत्रपती संभाजीनगर(दै. संध्या)

शासनाच्या केंद्रीय पथकाला विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज विभागीय आयुक्तालयात विभागातील दुष्काळी परिस्थितीचे सविस्तर सादरीकरण केले. यावेळी पर्जन्यमान, पावसातील खंड, खरीप पिकांची स्थिती, पिकांचे नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, धरणांतील पाणीसाठा, चारा तसेच उपग्रहाधारित पीक स्थिती निर्देशांकांची माहिती पथकासमोर मांडण्यात आली.

कृषी व शेतकरी कल्याण विभागाचे संयुक्त सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मुक्तानंद अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय पथकात महालनोबिस राष्ट्रीय पीक पूर्वानुमान केंद्राचे उपसंचालक सुनील कुमार दुबे, नीती आयोगाचे सल्लागार डॉ. जसपाल सिंग, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या पशुधन अधिकारी डॉ. साक्षी भदौरिया यांचा समावेश आहे.

याप्रसंगी राज्याच्या कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग हेही उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर विभागात ८ जिल्हे व ७६ तालुके असून, खरीप हंगामातील पेरणी जवळपास १०० टक्के म्हणजे सुमारे ५२ लाख हेक्टर क्षेत्रावर झाली आहे.

विवरणपत्रे, करपरतावे आणि करनिर्धारणाची प्रक्रिया यामध्ये सुधारणा करण्याबाबत शिफारसी

■ मुंबई (दै. संध्या)

जीएसटी परिषदेची 57वी बैठक नवी दिल्ली येथे केंद्रीय अर्थ व कॉर्पोरेट व्यवहार मंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

या बैठकीला दिल्ली, गोवा, हरियाणा, जम्मू-काश्मीर, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र आणि मेघालयचे मुख्यमंत्री उपस्थित होते. तसेच मणिपूर आणि तेलंगणाचे उपमुख्यमंत्री, विधानसभा असलेल्या राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री आणि वरिष्ठ अधिकारी, महसूल विभागाचे सचिव, केंद्रीय अप्रत्यक्ष कर व सीमाशुल्क मंडळाचे अध्यक्ष व सदस्य तसेच अर्थ मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. गेल्या वर्षी झालेल्या जीएसटी परिषदेच्या 56व्या बैठकीतील शिफारसींनुसार करण्यात आलेल्या नव्या पिढीतील सुधारणांमध्ये प्रामुख्याने करदरांचे तर्कसंगतीकरण आणि करदरांमध्ये कपात यावर भर देण्यात आला होता.

57व्या बैठकीत मुख्यतः जीएसटी नोंदणी, विवरणपत्रे, करपरतावे आणि करनिर्धारणाची प्रक्रिया यामध्ये सुधारणा करण्याबाबत शिफारसी करण्यात आल्या. तसेच काही वस्तू आणि सेवांवर जीएसटी लागू होण्याबाबत स्पष्टीकरणे देण्यात आली आणि व्यापाऱ्यांसाठी कर-अनुपालन अधिक सोपे करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यात आल्या. अ1. जीएसटी नोंदणीशी संबंधित सुधारणा 1. जीएसटी नोंदणीची प्रक्रिया अधिक सोपी आणि स्पष्ट करणे जीएसटी परिषदेच्या 56व्या बैठकीतील शिफारसीनुसार, ज्या अर्जदाराला दरमहा ₹2.5 लाखांपेक्षा जास्त कर-वजावट सवलत (आयटीसी)




पुढे हस्तांतरित करायची नाही, अशा अर्जदारांना CGST Rules, 2017 मधील Rule 14A अंतर्गत कर अधिकाऱ्याच्या हस्तक्षेपाशिवाय संगणकीय प्रणालीद्वारे स्वयंचलित जीएसटी नोंदणी दिली जात आहे. उर्वरित अर्जांची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी 57व्या बैठकीत पुढील शिफारसी करण्यात आल्या आहेत: जीएसटी नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे आणि माहिती यांची सविस्तर यादी असलेले परिपत्रक आणि वारंवार विचारले जाणारे प्रश्न जारी करणे. FORM GST REG-01 मध्ये बदल करून आवश्यक कागदपत्रे आणि माहिती निवडण्यासाठी पर्याय उपलब्ध करून देणे. जीएसटी संकेतस्थळावर सोपी मार्गदर्शक रचना, निवडसूची, सूचना आणि आवश्यक ठिकाणी मार्गदर्शन उपलब्ध करून देणे. यामुळे चुकीची किंवा अपुरी माहिती दिल्यामुळे नोंदणी अर्ज फेटाळले जाण्याचे प्रमाण कमी होईल आणि अर्जांवर जलद निर्णय घेता येईल.

जीएसटी नोंदणीतील बदलांची प्रक्रिया सुलभ करणे CGST Rules, 2017 मधील Rule 19 मध्ये बदल करून व्यवसायाच्या मुख्य ठिकाणाशी संबंधित तपशील वगळता नोंदणीतील इतर सर्व बदल संगणकीय प्रणालीद्वारे आपोआप स्वीकारण्याची शिफारस करण्यात आली आहे. Rule 14A अंतर्गत स्वयंचलित पद्धतीने नोंदणीकृत करदात्यांच्या बाबतीत व्यवसायाच्या मुख्य ठिकाणातील बदलदेखील आपोआप स्वीकारले जातील. यामुळे करदात्यांना नोंदणीतील माहिती जवळपास तत्काळ अद्ययावत करता येईल.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



लोकनृत्य स्पर्धेत कोंकण ज्ञानपीठ महाविद्यालय युवा महोत्सवात द्वितीय

पुणे : दैनिक संध्या

मुंबई विद्यापीठाच्या ५९ व्या सांस्कृतिक युवा महोत्सवाच्या अंतिम फेरीत लोकनृत्य या स्पर्धेत कोंकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला असून, विद्यार्थी, शिक्षक व महाविद्यालयीन प्रशासनाकडून विजेत्या संघाचे अभिनंदन करण्यात येत आहे. या अंतिम फेरीत मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत तब्बल ५७ महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये कोंकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरण च्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट सादरीकरणातून परीक्षकांची मने जिंकत द्वितीय क्रमांक मिळवला. या उल्लेखनीय यशामागे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पराग कारुळकर, सांस्कृतिक समिती, सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान राहिले. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल कोंकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरणचे व्यवस्थापन, प्राचार्य, सांस्कृतिक विभाग तसेच शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालयाकडून सातत्याने घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे हे यशस्वी फलित असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



केंद्रीय पथकाकडून महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी दौरा सुरू

पुणे (दै. संध्या)

खरीप हंगाम 2026 मधील दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन पथक महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. 11 ऑक्टोबरपर्यंतच्या या दौऱ्यात राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार असून, पाऊस, पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याच्या स्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे. केंद्राच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल हे या पथकाचे प्रमुख आहेत. केंद्र शासनाच्या कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग आणि अन्य संबंधित विभागांतील प्रशासकीय आणि तांत्रिक अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे. केंद्रीय पथकाच्या मुंबईतील आगमनानंतर सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी यावेळी पावसाच्या कमतरतेमुळे महाराष्ट्रातील काही भागांत निर्माण झालेली पाणीटंचाई, टँकर्सची संभाव्य गरज, शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर व जमीनधारकांचे प्रश्न, मजुरांची स्थलांतराची शक्यता आणि शेतकरी आत्महत्या या बाबींकडे केंद्रीय पथकाचे लक्ष वेधले. राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने अपर मुख्य सचिव विनिता वेद-सिंगल यांनी राज्यातील पावसाची स्थिती, अल निनोमुळे हवामान आणि पावसावर झालेले परिणाम तसेच शेतीपिकांच्या नुकसानीची सविस्तर आणि तांत्रिक माहिती दिली. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतही सविस्तर आढावा सादर करण्यात आला. कृषी विभागाच्या वतीने सचिव परिमल सिंह आणि आयुक्त सूरज मांढरे यांनी राज्यातील पिकांच्या नुकसानीची आणि जिल्हानिहाय परिस्थितीची वस्तुनिष्ठ माहिती केंद्रीय पथकासमोर मांडली. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयुक्त डॉ.किरण पाटील यांनी जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती तसेच आगामी सात महिन्यांसाठीच्या संभाव्य परिस्थितीची माहिती दिली.

डिजिटल अरेस्टच्या जाळ्यात अडकण्यापूर्वीच १२.५० लाख वाचविले!

येरवडा सायबर पथकाची तत्पर कारवाई; बनावट पोलीस अधिकाऱ्यांकडून नागरिकाला धमकावून बँक खात्यांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न

■ पुणे (दै. संध्या)



'तुमचे एटीएम कार्ड एका आरोपीकडे सापडले असून तुमच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. अटक टाळायची असेल तर तुमच्या बँक खात्यांची, मुदत ठेवींची आणि इतर आर्थिक व्यवहारांची माहिती द्या,' अशी धमकी देत एका ५४ वर्षीय नागरिकाला 'डिजिटल अरेस्ट' करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, फसवणुकीचा प्रकार लक्षात येताच नागरिकाने तत्काळ येरवडा पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाशी संपर्क साधला. सायबर पथकाने क्षणाचाही विलंब न करता संबंधित बँकांशी संपर्क साधून खाती गोठविल्याने १२ लाख ५० हजार रुपयांची रक्कम सुरक्षित करण्यात पोलिसांना यश आले. याप्रकरणी प्रमोद माधव पोरे (वय ५४, रा. त्रिदल नगर, येरवडा, पुणे) यांना दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास अनोळखी क्रमांकावरून दूरध्वनी आला. समोरील व्यक्तीने आपण पोलीस अधिकारी असल्याचे भासवून पोरे यांना घाबरविण्यास सुरुवात केली.

'तुमचे एटीएम कार्ड नरेश गोयल नावाच्या आरोपीकडे सापडले आहे. तुमच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक टाळायची असेल तर तुमच्या बँक खात्यांची, मुदत ठेवींची आणि आर्थिक व्यवहारांची माहिती द्या,' असे सांगून संबंधिताने पोरे यांच्यावर दबाव आणला. त्यानंतर त्यांना 'डिजिटल अरेस्ट' करण्याची भीती दाखविण्यात आली.

घाबरलेल्या पोरे यांनी संबंधितांना त्यांच्या बँक खात्यांची माहिती दिली. मात्र, काही वेळाने आपली फसवणूक करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने येरवडा पोलीस ठाण्याच्या सायबर पथकाशी संपर्क साधला.

सायबर पथकाने प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तत्काळ हालचाली सुरू केल्या. संबंधित बँकांशी तातडीने संपर्क साधून पोरे यांची बँक खाती गोठविण्याची कार्यवाही करण्यात आली. त्यामुळे त्यांच्या खात्यातील १२.५० लाख रुपयांची रक्कम सायबर भामट्यांच्या हातात जाण्यापासून वाचली. या प्रकरणातून नागरिकांनी अनोळखी व्यक्तींकडून येणाऱ्या अशा धमकीच्या दूरध्वनींपासून सावध राहण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. सीबीआय, ईडी, पोलीस, सीमाशुल्क विभाग अथवा अन्य कोणत्याही सरकारी यंत्रणेच्या नावाने दूरध्वनी करून 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली पैसे किंवा गोपनीय माहिती मागणे हा सायबर गुन्हेगारांचा फसवणुकीचा प्रकार आहे. सीबीआय, ईडी, पोलीस किंवा सीमाशुल्क विभागाच्या नावाने अशा प्रकारचा दूरध्वनी आल्यास घाबरून जाऊ नये. कोणतीही वैयक्तिक किंवा बँक खात्याची माहिती, संकेतशब्द अथवा एकदाच वापरला जाणारा संकेतांक (ओटीपी) कोणालाही देऊ नये. संशयास्पद दूरध्वनी आल्यास तातडीने १९३० या सायबर गुन्हे हेल्पलाइन क्रमांकावर किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) मनोज पाटील, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-४ चिलुमुला रजनिकांत आणि सहायक पोलीस आयुक्त येरवडा विभाग सुनील जैतापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते, पोलीस निरीक्षक शारदा कोकाटे (गुन्हे), पोलीस निरीक्षक केशव दिंडे (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश राठोड, पोलीस हवालदार समीर पिलाने, पोलीस शिपाई मनोज भागवत, स्वप्निल पिंगळे, महिला पोलीस शिपाई रोहिणी भोकसे आणि महिला पोलीस शिपाई मिनाक्षी कापडे यांच्या सायबर तपास पथकाने ही कारवाई केली.

उद्योगनगरीमध्ये अल्युमिनियम ग्रेट डाय कास्टिंग तांत्रिक परिषद व प्रदर्शन २०२६चे उद्घाटन

पुणे (दै. संध्या)



अल्युमिनियम ग्रेट डाय कास्टिंग, विद्युत वाहने, ईव्ही-मोबिलिटी ॲप्लिकेशन आणि आधुनिक वाहन उद्योगासाठी आवश्यक तंत्रज्ञान, नवकल्पना तसेच उत्पादन क्षेत्रातील आधुनिक प्रक्रियांवर चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'जीडीसीटेक तांत्रिक परिषद व प्रदर्शन २०२६' चे उद्घाटन पिंपरी-चिंचवड येथील हॉटेल कलासागर येथे उत्साहात संपन्न झाले.

या परिषदेत अल्युमिनियमच्या मोठ्या आकारातील डाय कास्टिंग तंत्रज्ञानातील आधुनिक प्रक्रिया, विद्युत वाहनांसाठी आवश्यक घटक, ईव्ही-मोबिलिटी ॲप्लिकेशनमधील तांत्रिक आवश्यकता, वाहन उद्योगातील बदल, उत्पादन क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान तसेच भविष्यातील औद्योगिक संधी याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला टाटा मोटर्स कमर्शियल व्हेईकल्सचे खरेदी व पुरवठा साखळी विभागाचे मुख्य अधिकारी जयकुमार एस. चुट्टर, ज्येष्ठ सल्लागार व उद्योजक तसेच मिटकॉन चे माजी विभागप्रमुख राजेंद्र घोरपडे आणि जीडीसीटेकचे अध्यक्ष तथा पूजा प्रिसिजन लिमिटेडचे अध्यक्ष अनिल कुलकर्णी, जीडीसीटेकचे संस्थापक आर टी कुलकर्णी, जीडीसीटेकचे सेक्रेटरी अनिरुद्ध इनामदार, जीडीसीटेकचे उपाध्यक्ष सागर कौशिक,जितेंद्र लखोटिया,किशोर डुकरे, खजिनदार नितीन भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती. परिषदेदरम्यान उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ, उत्पादक, तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रतिनिधी आणि व्यावसायिकांनी परस्पर संवाद साधला. डाय कास्टिंग तंत्रज्ञान, ईव्ही-मोबिलिटी ॲप्लिकेशन, विद्युत वाहन उद्योग आणि आधुनिक वाहन निर्मिती क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान व भविष्यातील संधींबाबत यावेळी विचारांची देवाणघेवाण करण्यात आली.

अल्युमिनियम डाय कास्टिंग उद्योगाला विद्युत वाहन, ईव्ही-मोबिलिटी आणि आधुनिक वाहन उद्योगाशी जोडण्यासाठी जीडीसीटेक २०२६च्या माध्यमातून महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. भारतीय उत्पादन क्षेत्र अधिक सक्षम, आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित करण्याच्या दिशेने ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले.

या प्रदर्शनात अल्युमिनियम डाय कास्टिंगचे विविध घटक, उत्पादन तंत्रज्ञान, ईव्ही-मोबिलिटीसाठी वापरले जाणारे घटक व ॲप्लिकेशन, तसेच आधुनिक औद्योगिक उपकरणांचे प्रदर्शन करण्यात आले. त्यामुळे उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती घेण्याबरोबरच विविध कंपन्यांशी व्यावसायिक संवाद साधण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे अभिनंदन केले. जीडीसीटेकचे अध्यक्ष तथा पूजा प्रिसिजन लिमिटेडचे अध्यक्ष अनिल कुलकर्णी यांनी उपस्थित मान्यवर, उद्योग प्रतिनिधी आणि सहभागींचे आभार मानले.



मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री राणे यांच्याकडून कृष्णापट्टनम अदानी पोर्टची पाहणी

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या बंदर विकासाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आंध्र प्रदेशातील कृष्णापट्टनम येथील अदानी पोर्टला भेट देऊन बंदरातील अत्याधुनिक पायाभूत सुविधा, कार्गो हाताळणी व्यवस्था, खोल पाण्यातील जहाजांसाठी उपलब्ध सुविधा तसेच आधुनिक कार्यपद्धतींची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यातील महाराष्ट्रासाठी उपयुक्त बाबी राज्यात प्रभावीपणे राबवून राज्यातील बंदर विकासाला नवी दिशा मिळेल असे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. महाराष्ट्राला मोठा समुद्रकिनारा लाभला असून राज्यातील बंदर क्षेत्राच्या विकासाला मोठी क्षमता आहे. या पार्श्वभूमीवर आधुनिक तंत्रज्ञान, सक्षम पायाभूत सुविधा आणि कार्यक्षम व्यवस्थापनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील बंदर क्षेत्राला आधुनिक, सक्षम आणि जागतिक दर्जाचे बनविण्यासाठी अशा अभ्यासदौऱ्यांतून मिळणारे अनुभव उपयुक्त ठरणार आहेत. बंदर विकास आणि जहाजबांधणी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि कार्यक्षम व्यवस्थापन पद्धतींचा अभ्यास करण्यासाठी या अभ्यासदौऱ्याचे महत्व आहे.

या भेटीदरम्यान बंदरातील कार्गो हाताळणीची कार्यपद्धती, खोल पाण्यातील जहाजांच्या वाहतुकीसाठीची सुविधा, अत्याधुनिक पायाभूत व्यवस्था आणि बंदराच्या दैनंदिन कामकाजातील तंत्रज्ञानाचा वापर याबाबत माहिती घेण्यात आली. तसेच बंदर क्षेत्रात अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी शासनाची भूमिका काय असावी, मंजुरी प्रक्रिया कशा पद्धतीने अधिक सुलभ करता येईल, उद्योगांसमोरील कामकाजातील अडचणी कशा दूर करता येतील आणि बंदरांच्या माध्यमातून व्यापक आर्थिक विकासाला चालना देणारी सक्षम परिसंस्था कशी निर्माण करता येईल, यावरही चर्चा करण्यात आली.

तागापासून तयार केलेल्या वस्तूच्या वापराने पर्यावरण संवर्धन शक्य; शशी भूषण सिंह यांचे मत

■ पुणे (दै. संध्या)



अलीकडच्या काळात सिंथेटिक आणि प्लास्टिकचा वापर हा पर्यावरणासाठी हानिकारक बनला आहे, तागापासून तयार केलेल्या वस्तू या पर्यावरणपूरक ठरत असून त्यामुळे शाश्वत विकासाला चालना मिळणे शक्य असल्याचे मत केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय ताग मंडळाचे सचिव आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शशी भूषण सिंह यांनी गुरुवारी व्यक्त केले.

शिखाऊ कारीगरी आणि केंद्र सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने भरवण्यात आलेल्या 'एक भारत, श्रेष्ठ भारत – फॅशन अँड लाइफस्टाइल एक्स्पो २०२६' चे उदघाट्न त्यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला पुण्याच्या विभागीय आयुक्त शीतल बसवराज तेली उगले, पुणे क्लस्टर, एसईझेडच्या सह-विकास आयुक्त मितल सुधीर हिरेमठ, सीआयडीचे महानिरीक्षक सुधीर हिरेमठ, राष्ट्रीय ताग मंडळाचे संचालक किशन सिंग घुघत्याल, सदर्न कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण, अभिनेत्री सायली पाटील, नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ नॅचरोपॅथीच्या संचालिका गीता बाळकृष्ण शेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते.

८ ते ११ ऑक्टोबर दरम्यान बंड गार्डन रोड वरील पूना क्लब इथे याचे आयोजन करण्यात आले आहे.

पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी तागापासून तयार केलेल्या वस्तूंचा वापर करणे अधिक फायदेशीर ठरत आहे. त्यामधून नॅचरल फायबर मोठ्या प्रमाणात मिळते. त्यामध्ये कार्बन फूटप्रिंटचे प्रमाण अजिबात नाही. एक हेकटर तागाच्या शेतीमधून ११ टन ऑक्सिजनची निर्मिती केली जाते, त्यामुळे भविष्याचा विचार करता ताग हे खूपच ठरणार आहे. देशवासीयांनी त्याचा अधिकाधिक वापर केला तर पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी ते अधिक फायदेही ठरणार असल्याचे शशी भूषण सिंह यावेळी म्हणाले.

पुणे हे कला आणि विद्येचे माहेरघर आहे, त्यामुळे या प्रदर्शनात सादर करण्यात आलेल्या कलाकृतींच्या माध्यमातून देशभरातील कलाकारांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे, या प्रदर्शनात ११० पेक्षा अधिक स्टॉल असून त्यामध्ये पारंपरिक भारतीय कला आणि हस्तकलेशी निगडित अनेक वस्तू उपलब्ध असल्याचे शीतल तेली यावेळी म्हणाल्या.

आपला देश हा विविध कलानी भरलेला आहे, त्यामुळे देशाच्या विविध भागात तयार होणाऱ्या कलाकृतींना या प्रदर्शनाच्या माध्यमातून एक व्यासपीठ मिळाले असल्याचे सायली पाटील यावेळी म्हणाल्या. भारतीय हस्तकला आणि पारंपरिक कारागिरीला प्रोत्साहन देण्याबरोबरच उद्योजक, कारागीर, डिझायनर्स, विद्यार्थी आणि ग्राहक यांना एकत्र आणणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे.

थर्मेक्सकडून बॉयलर इंडिया २०२६ मध्ये इंटेलिजेंट बॉयलर्स आणि हीटर्सची नवी श्रेणी थर्मेक्स-आय सिरीज लाँच

■ पुणे (दै. संध्या)



थर्मेक्स या ऊर्जा परिवर्तनातील विश्वासार्ह भागीदार आणि ऊर्जा व पर्यावरणविषयक सोल्यूशन्सच्या आघाडीच्या पुरवठादार कंपनीने आज बॉयलर इंडिया २०२६ मध्ये इंटेलिजेंट बॉयलर्स आणि हीटर्सची नवी श्रेणी 'थर्मेक्स-आय सिरीज'च्या लाँचची घोषणा केली. ही सिरीज बदलत्या ऑपरेटिंग परिस्थितीनुसार हीटिंग उपकरणांची कामगिरी सतत ऑप्टिमाइझ करते.

या सिरीजमधील पहिले उत्पादन 'अल्ट्रापॅक-आय' इंटेलिजेंट बायोमास-फायर्ड बॉयलर आहे, जे इंधनाची वैशिष्ट्ये, सभोवतालची परिस्थिती आणि प्रक्रियेच्या मागणीतील बदलांचा आधीच अंदाज घेते, तसेच बॉयलरची कार्यक्षमता सुधारण्यासाठी रिअल टाइम स्वयंचलितपणे सुधारात्मक उपाययोजना करते. यामुळे प्रतिक्रियाशील दृष्टिकोनाकडून सक्रिय दृष्टिकोनाकडे मोठे स्थित्यंतर घडून येते.

जागतिक स्तरावर उद्योगातील पहिली नाविन्यपूर्ण संकल्पना अल्ट्रापॅक-आय थर्मेक्सचे प्रोप्रायटरी फिजिक्स-एन्हान्स्ड, डेटा-चालित कंट्रोल तंत्रज्ञान 'एज कंट्रोल'द्वारे समर्थित आहे. प्रायोगिक तत्त्वावरील इन्स्टॉलेशन्समध्ये १० टक्क्यांपर्यंत इंधन बचत दिसून आली आहे, ज्यामुळे उद्योगांना ऑपरेटिंग खर्च आणि संबंधित कार्बन उत्सर्जनात घट करण्याची उत्तम संधी मिळते.

नवी मुंबईतील सिडको एक्झिबिशन सेंटर येथे ८ ते १० ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनामध्ये संपूर्ण कालावधीत अल्ट्रापॅक-आय बॉयलर थर्मेक्सच्या बूथवर प्रदर्शनासाठी उपलब्ध असेल.

एज कंट्रोल योग्य विद्यमान बॉयलर्स आणि इतर उपकरणांसाठी रेट्रोफिट सोल्यूशन म्हणूनही दिले जाऊ शकते, ज्यामुळे ग्राहकांना आपली सध्याची उपकरणे न बदलता विद्यमान असेट्समध्ये इंटेलिजेंट नियंत्रण आणि ऑप्टिमायझेशन आणणे शक्य होईल.

"गेल्या सहा दशकांपासून थर्मेक्सने उद्योग क्षेत्रात उष्णता कशी निर्माण केली जाते आणि उष्णतेचा वापर कसा होतो, हे सुधारण्यासाठी सातत्याने काम केले आहे. आमची इंटेलिजेंट बॉयलर्सची सिरीज त्या प्रवासातील पुढचे स्थित्यंतर दर्शवते, ज्यामध्ये कम्बशन (ज्वलन) आणि बॉयलर्सविषयी आमच्या ज्ञानाचे संयोजन प्रगत ॲनालिटिक्स आणि इंटेलिजेंट नियंत्रणासोबत करण्यात आले आहे. बदलत्या परिस्थितीचा आधीच अंदाज घेऊन स्वतःला ऑप्टिमाइझ करण्याची बॉयलरची ही क्षमता विशेषतः बायोमाससारख्या इंधनांच्या बाबतीत महत्त्वपूर्ण मूल्य निर्माण करू शकते. हा एक क्रांतिकारी टप्पा असून थर्मेक्स आणि आमच्या ग्राहकांसाठी पुढे टाकलेले उत्साहवर्धक पाऊल आहे. आम्ही थर्मेक्स-आय सिरीजची सुरुवात बॉयलर्स व हीटर्सपासून करत आहोत आणि हळूहळू या इंटेलिजेंट क्षमतांचा विस्तार आमच्या व्यापक पोर्टफोलिओमध्ये करणार आहोत," असे थर्मेक्स लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ आशिष भंडारी म्हणाले.